◆एप्रिल २००५
◆वर्ष पाचवे
◆अंक चौथा

# मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

**संपादकीय** - २
**साहित्यवार्ता** ५
**पुस्तक परिचय**
**दक्षिणायन**: केप हॉर्न ते कॅरिबियन
डॉ. रणजित मिरजे २४
**पाणी** : एक अद्‌भुत उपचार पद्धती
अनु. सुभाष जोशी २९
**चाइल्ड ऑफ होलोकास्ट**
अनु. सिंधु विजय जोशी ३६
**पुरस्कार** ३९
**साधंसुधं** ४८
**बालनगरी** ५२

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### *डी. जयकांतन यांना ज्ञानपीठ पुरस्कार*

तामीळ लेखक डी. जयकांतन यांना इ. स. २००२चा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला आहे. हा ३८वा ज्ञानपीठ पुरस्कार आहे आणि तामीळ भाषेला तो दुसऱ्यांदा मिळत आहे. या आधीचा पुरस्कार १९७५ मध्ये पी. व्ही. अखिलानंदम (१९२३-८८) यांना त्यांच्या 'चित्तिरप्पावै' या कादंबरीसाठी देण्यात आला होता. त्यानंतर सुमारे तीस वर्षांनी तामीळ भाषेला हा मान लाभला आहे. आपण मराठी भाषक आजवर हा पुरस्कार आपल्या वाट्याला दोनदाच आला म्हणून खंत बाळगत आलो आहे. कानडीला हा पुरस्कार सात वेळा मिळाला, हिंदी-बंगाली भाषांना सहा वेळा मिळाला, आपल्यापेक्षा तुलनेने साहित्य आणि ग्रंथव्यवहार कमी असलेल्या भाषांनाही अधिक वेळा मिळाला - याची सल बोचत राहते. मल्याळी, उर्दू, उडिया यांच्या वाट्यालाही अधिक वेळा आला; आपण कुठे कमी पडतो? आपले काय चुकते? बरे, आपल्याला दोन वेळा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला, त्या दोघां पुरस्कार विजेत्यांनाही प्रा. नामवर सिंहासारखे हिंदीतील लब्धप्रतिष्ठित समीक्षक दुय्यम ठरवून मोकळे होतात; किंवा पी. व्ही. नरसिंहराव यांच्यासारख्या ज्ञानपीठाच्या त्यावेळच्या अध्यक्षांच्या हस्तक्षेपामुळे आपल्या लेखकांची निवड होते - हा एकूणच प्रकार आपल्याला नामुष्कीचा वाटतो. अत्यंत प्राचीन म्हणून गणली जाणारी तामीळ भााषा ही देखील याबाबतीत आपल्याच मराठीच्या पंक्तीला आहे. हा विचार कदाचित् काही मराठी मनांना सुखावून जाईल. डी. जयकांतन यांचे अभिनंदन करताना त्यामुळेच आपल्याला अधिक आत्मीयता वाटेल.

१९३४ मध्ये एका सामान्य मध्यवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या डी. जयकांतन यांच्या नावावर चाळीस कादंबऱ्या आणि दोनशेवर कथा आहेत. अनेक चित्रपटांच्या कथा त्यांनी लिहिलेल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांची आणि कथांची भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत. नॅशनल बुक ट्रस्टने त्यांच्या निवडक कथांचे संकलन प्रसिद्ध केले आहे. त्याचा माधव कानिटकर यांनी केलेला मराठी अनुवादही 'जयकांतनच्या कथा' या नावाने नॅशनल बुक ट्रस्टनेच प्रसिद्ध केला आहे. नोबेल पुरस्काराचे फ्रेंच मानकरी रोमां रोलां यांनी लिहिलेल्या महात्मा गांधी यांच्या चरित्राचा तमिळ अनुवादही जयकांतन यांच्या नावावर आहे. जयकांतन हे गांधीवाद आणि मार्क्सवाद या दोहोंचा संगम व्हावा आणि सर्वसामान्य माणसालाही सन्मानाने जगता यावे, त्याला आपली स्वप्ने प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळावी, आपल्या ऐहिक अस्तित्वाचे चीज करता यावे, साफल्य सार्थकतेचा मुक्तीचा आनंद मिळावा



अशी त्यांची आंतरिक धारणा असून, मानवी जीवनातील मांगल्याची, उदात्ततेची पूजा बांधण्यात त्यांना धन्यता वाटते.

दक्षिण भारतातील बहुतेक लेखक हे चित्रपटसृष्टीशी संबंधित असतात; आणि त्यांच्या प्रतिभेचा उपयोग करून घेण्यास तेथील निर्माते उत्सुक असतात. मास्टर विनायक यांनी वि. स. खांडेकर, मामा वरेरकर, आचार्य अत्रे, ना. सी. फडके वगैरे प्रतिभावंतांना कथा-पटकथा लिहिण्यास प्रवृत्त करून अनेक उत्तम चित्रपट मराठीत निर्माण केले, त्याच प्रकारे तमिळ-तेलगू-कानडी मध्ये चित्रपट निर्माते तेथील कथाकादंबरीकारांच्या कल्पकतेवर विसंबून असतात. साहजिकच, जयकांतन यांच्या सारख्या बहुप्रसव साहित्यिकाला चित्रपटकथांचे कुरण आकर्षक वाटावे यात नवल नव्हते. त्यांच्या कथांवरचे चित्रपट गाजत राहिले, कधीकधी त्यांनी स्वत: दिग्दर्शनही केले. त्यामुळे त्यांना कमाईही चांगली होत राहिली. परंतु या मोहमयी दुनियेची भूल मात्र त्यांनी पडू दिली नाही. तमिळ नियतकालिकांमध्ये सातत्याने कादंबऱ्यांचे आणि कथांचे लेखन त्यांनी चालूच ठेवले; आपला वाचकवर्ग त्यांनी निर्माण केला आणि तो सांभाळूनही ठेवला. जयकांतन यांनी ऐन विशीतच कथालेखनाला आरंभ केला आणि त्यावेळच्या तरुणांप्रमाणे कम्युनिस्ट विचारसरणीच्या प्रभावाखाली सामाजिक राजकीय विषमतेवर कोरडे ओढणाऱ्या विषयांना आपल्या लेखनात केंद्रस्थान दिले. १९६० ते ७० या काळात त्यांच्या सव्यसाची कथाकादंबऱ्यांनी तमिळ वाचकांना मोहिनी घातली. कल्पना हे मासिक त्यांनी चालवले. त्यांच्या लेखनाचा झपाटा स्तिमित करणारा होता; आणि त्यांचे लेखन व जीवनदर्शन आक्रमक, घणाघाती, वास्तववादी असे. साठी-नंतरच्या तीन दशकातील जयकांतन हे तमिळमधले सर्वात जास्त लोकप्रिय लेखक होते. १९७१ साली साहित्य अकादमीचा पुरस्कार सिल नैरांगककिलसिल मनिथरकल या कादंबरीला मिळाला.

तमिळमध्ये कथासाहित्य मोठे समृद्ध आहे. सुब्रह्मण्यम भारती यांनी १९१० मध्ये फ्रेंचांच्या अमलाखालील पाँडिचरीला भेट देऊन आरिल ओरू पंगू ही कथा लिहिली. तिने तमिळमध्ये कथेचे नवे पर्व सुरू केले. एका दलित तरुणाचे सवर्ण तरुणीवर प्रेम जडते; तो स्वातंत्र्य संग्रामात स्वत:ला झोकून देतो. आपल्या प्रेयसीला तो सांगतो, ''मी आजीवन ब्रह्मचर्याची शपथ घेतलेली आहे. देश आणि समाज यांच्यासाठी आणि दलितांच्या उद्धारासाठी मी आपले सर्वस्व वाहिलेले आहे.'' त्याची गाठ बंगाली क्रांतिकारकांशी पडते आणि त्यातून त्याची परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करण्याची जिद्द अधिकच उफाळून येते असे दाखवणारी ही कथा, त्यावेळच्या ब्रिटिश सरकारला रुचली नाही. तिच्यावर बंदी घालण्यात आली... स्वा. सावरकरांबरोबर इंग्लंडमध्ये असलेल्या वे. स. अय्यर या तरुणाने पाँडिचरीला येऊन ब्रिटिशविरोधी आंदोलन चालवले होते. मिल्टन आणि तामिळ कवी कंबन यांच्यावर तुलनात्मक संशोधन प्रबंध लिहिणाऱ्या अय्यर यांनी लॅटिन, फ्रेंच, संस्कृत, इंग्रजी साहित्याचाही अभ्यास केलेला होता. पाँडिचरीला आल्यावर त्यांनीही कथालेखनाला आरंभ केला. देशप्रेमाच्या आणि बलिदानाच्या या कथा 'मंगैयरकरसियिन कादल' या नावाने

पुस्तकरूपात प्रसिद्ध झाल्या. कथेच्या आकृतिबंधाबाबत अय्यर विशेष जागरूक होते. रवीन्द्रनाथांच्या कथांचे अनुवादही त्यांना प्रेरणादायक वाटले.''

१९२५ नंतर ति. ज. रंगनाथन यांनी आपल्या दोन कथासंग्रहातून तमिळ कथेला काव्यात्मक शैलीने अलंकृत केले पदुमैपित्तन यांनी तामिळ कथेला नव्या वैभवशिखरावर नेले. बेचाळिसाव्या वर्षी ते वारले; पण झपाटल्यासारख्या शेकडो कथा त्यांनी लिहिल्या; आशय आणि अभिव्यक्तीचे वैविध्य त्यात दिसते.

काफ्काच्या शैलीत लिहिणारे मौनी, कुटुंबगाथा लिहिणारे रामामृतम, नीतिवादी अभिजात लेखन करणारे चिदंबर सुब्रह्मण्यन, वास्तववादी सूक्ष्म तपशीलात रमणारे चेल्लप्पा यांनीही १९३०-४० या दशकात तमिळ कथेला समृद्ध केले. मणिक्कोडी (१९३३-३९) या मासिकानेही अनेक कथालेखकांना आपल्याकडील सत्यकथेप्रमाणे. प्रेरणा दिली. बी. एस. रामय्या हे त्याचे अध्वर्यू होते. ते स्वत: उत्तम कथाकार होते. 'मणिक्कोडी' सात वर्षांनी बंद पडले; परंतु त्यानंतर अनेक मासिके निघाली आणि रविवार पुरवण्यांमध्येही कथांना स्थान मिळू लागले.

जानकीराम, कु. अलगिरिसामी, टी एम सी रघुनाथन, वेंकटरमणि करिच्चान कुंजु यांनी चाळीस- ते पन्नासच्या दशकात विपुल कथालेखन केले.

लघुपत्रिकांनी १९५० नंतर एकूणच लेखनाला नवी दिशा दिली. कथा-कादंबरीचे आकृतिबंध मुक्तमोकळे झाले. याच काळात जयकांतन यांनी वास्तवाचा वर्गसंघर्ष पोटतिडकीने, आक्रमकपणे रंगवला आणि आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. साठोत्तरी काळात नवीन लेखकांची नवीन पिढी वेगळे प्रयोग करीत स्वत:चे पृथगात्म कर्तृत्व दाखवत राहिली; लेखनाला व्यावसायिक स्वरूप आले. चित्रपट आणि दूरचित्रवाणीवरील मालिका यांनी त्या व्यावसायिकतेला खतपाणी घातले. इंदिरा पार्थसारथी, अशोक मित्रन, चावकिन, प्रपंचन, दिलीपकुमार, गोपीकृष्णन वगैरे लेखकांनी कथांप्रमाणेच इतर वाङ्मयप्रकारातही संचार केला. इंदिरा पार्थसारथी यांना सरस्वती सन्मान लाभला. परंतु या काळातही जुन्या लेखकांचा दबदबा राहिला; आणि जयकांतनच्या कारु, ओ अमेरिका, ईश्वरअल्ला तेरे नाम, जयजय शंकर इ. कथाकादंबऱ्यांचा नव्या वाचकांनाही आकृष्ट करण्याचा झपाटा टिकून राहिला. त्याचेच प्रत्यंतर म्हणजे जयकांतन यांना मिळालेला हा ज्ञानपीठ पुरस्कार, जयकांतनचा नंबर लागला; याचा अर्थ ज्ञानपीठच्या निवड समितीच्या नजरेत आता साठी-सत्तरीतले लेखकही येऊ लागले आहेत, असा होतो त्या आधी काही अपवाद वगळता सहस्रचंद्रदर्शन केलेले लेखकच या समितीच्या दृष्टिपथात येऊ शकत. तेव्हा आता साठीच्या आतल्या लेखकांनाही ज्ञानपीठची स्वप्ने दिसायला अडचण ठरू नये.

जयकांतन यांना सत्तरीतच हा पुरस्कार देऊन ज्ञानपीठने नवीनांचा मार्ग प्रशस्त करून दिला याबद्दल आनंद व्यक्त करणे अकाली किंवा उतावीळपणाचे ठरू नये असे वाटते.





## साहित्यवार्ता

### * जुने लेखक आऊट, नवीन लेखक इन

सध्या इंग्लंडमध्ये एका विषयावर सर्व थरांतून उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. हा विषय आहे शाळेतील मुलांच्या इंग्रजी अभ्यासक्रमाचा! इंग्लंडमध्ये रूढ असणारा इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम १९८९ मध्ये बॅरनेस थॅचर यांनी बनवला होता. कालानुरूप त्यात थोडेफार बदलही होत राहिले. मात्र वर्षानुवर्षे शेक्सपिअर, डॅनिअल डेफो, विल्यम कॉनग्रीव, केथ डग्लस, जॉन मिल्टन, रॉबर्ट हेरिक, हेन्री वॉगन अशा कथाकादंबरीकारांचे उतारे, प्राथमिक शिक्षणात कायम राहिले. पण आता शेक्सपिअर वगळता या बहुतेक लेखकांना शालेय पुस्तकातून डच्चू मिळणार आहे. त्यांच्याऐवजी मॉडर्न जमान्याचे, फँटसी कथा लिहिणारे टोल्किन, फिलिप पूलमन, बूकर पुरस्कार विजेत्या अँड्रा लॅवी, इयान मॅकवनसारख्या लेखकांचा समावेश अभ्यासक्रमात होईल.

काहींच्या मते, मुलांना आधुनिकतेची शिकवण देण्याची जरुरी आहे. नवीन लेखकांचे लिखाण म्हणजे आजच्या समाजाचे प्रतिबिंब असल्याचे वाटते. काही शिक्षक म्हणतात की लेखकांची संख्या वाढवण्यापेक्षा, आहेत त्याच पुस्तकांचा सखोल अभ्यास झाला पाहिजे, मग लेखक कोणताही असो. तसेच इंग्रजी साहित्याचे १९१४च्या पूर्वी व नंतर असे विभाजन करणे शिक्षकांना मान्य नाही.

मुलांची वाचनपद्धती, त्यांनी काय वाचावे किंवा वाचू नये, जुन्या लेखकांपेक्षा नवे लेखक कसे चांगले आहेत, असे अनेक वाद यातून पुढे आले आहेत. पण वाचन ही गोष्ट फक्त शाळेपुरती मर्यादित न राहता मुलांना त्यांचा छंद जडावा, जास्तीत जास्त पुस्तके वाचून त्यांनीच लेखक ठरवावेत हा विचार सध्या बाजूलाच पडलेला दिसतो. नवे लेखक जर सध्याच्या समाजाचा आरसा असतील तर पारंपरिक लेखक जुन्या समाजाचे अंतरंग मुलांना उलगडून दाखवतील. साहित्यातील अनेक पैलू मुलांना शिकवतील. 'बालभारती'मध्येही असे काही होणे इष्ट ठरेल.

### * आयुकातील 'मुक्तांगण विज्ञान शोधिका'

खगोलविज्ञानावर काम करणाऱ्या 'आयुका'तर्फे विज्ञान संशोधनावर आधारित 'मुक्तांगण विज्ञान शोधिका' या प्रकल्पासाठी दिवंगत साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या ३० लाख रुपयांच्या देणगीतून विद्यार्थ्यांसाठी संकुल बांधले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी म्हणून या प्रकल्पासाठी आणखी एका अनामिकाने २० लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे.

'मुक्तांगण विज्ञान शोधिके'मध्ये काम करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांमधील उत्साह, नीतिधैर्य आणि आत्मविश्वास या मुळे द्विगुणित होईल. तसेच विज्ञान शिक्षणासाठी देणगी देणाऱ्या दानशूर लोकांना यातून प्रेरणा मिळेल.

मुक्तांगण विज्ञान शोधिका संकुलाचे दर आठवड्यास विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित केल्या जातात, असे आयुकाचे प्रा. अरविंद परांजपे यांनी सांगितले. ते म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांप्रमाणेच कॉलेजमधील विज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांनाही याठिकाणी काम करण्याची संधी दिली जाते. त्यानुसार काही कॉलेज विद्यार्थ्यांनी सूर्यप्रकाश पृष्ठभागाचा अभ्यास या प्रकल्पाद्वारे केला होता.

### * 'विश्वकोश वार्षिकी २००५'चे प्रकाशन

'ज्ञानयोगी' श्रीकांत जिचकार यांनी सिद्ध केलेल्या 'विश्वकोश वार्षिकी २००५'चे प्रकाशन अत्यंत भावपूर्ण वातावरणात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पार पडले. या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी जिचकार यांच्या आठवणीने सर्व वातावरण भावपूर्ण बनले होते. डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या कार्यकारी संपादकत्वाखाली 'विश्वकोश वार्षिकी २००५'हा एक हजार पृष्ठांचा ग्रंथ तयार केला गेला. पण प्रकाशनाआधीच जिचकारांना काळाने ओढून नेले. 'दैवाच्या या कठोर न्यायानंतरही देवावरची श्रद्धा यत्किंचितही कमी होऊ दिली नाही. मिळालेले दान स्वीकारून कामाला लागले अन् जिचकारांचे स्वप्न साकार झाले, याचा मला आनंद आहे,' असे जिचकारांच्या पत्नी राजश्री जिचकार यांनी म्हटले.

जिचकारांना अनेक पदे मिळाली तरी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षपदी झालेली नियुक्ती हा त्यांच्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा क्षण होता, असे राजश्री जिचकार यांनी सांगितले.

### * सुवर्णमहोत्सवी 'गीतरामायण'!

गीतरामायणाला यंदा ५० वर्षे पूर्ण होत असल्याने संतोष पोतदार इव्हेंटस् आणि रंगयात्रा यांच्यातर्फे ज्येष्ठ संगीतकार आणि गायक श्रीधर फडके यांचा 'गीतरामायण' हा कार्यक्रम १९ मार्चला आयोजित केला होता.

या चार तासांच्या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ गीतकार आनंद माडगूळकर, संगीतकार प्रभाकर जोग आणि 'गीतरामायण' कार्यक्रमातील बाबूजींचे सहकारी हार्मोनियम वादक शामराव कांबळे यांचा सहभाग होता.

याच कार्यक्रमात मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठानतर्फे प्रवीण वाळिंबे यांनी संपादित केलेला सुधीर फडके स्मृती विशेषांकाचेही प्रकाशन करण्यात आले. बाबूजींनी गीतरामायणाचा शेवटचा जाहीर कार्यक्रम जून ९२ मध्ये गरवारे कॉलेजच्या पटांगणावर केला होता.

### * कवी श्रेष्ठ, गीतकार दुय्यम असे कोणी ठरवले?

कवी श्रेष्ठ आणि गीतकार दुय्यम हे कोणी ठरविले? कवितेइतकीच प्रतिभा गाण्यातही दिसते. साहित्याचे आणि जीवनाचे असे कप्पे पाडून चालत नाही.



मराठी समीक्षेला नको त्या खोडी जडल्या आहेत, असे मत ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांनी पुण्यात व्यक्त केले.

'महाराष्ट्र साहित्य कलाप्रसारिणी' संस्थेतर्फे गंगाधर महांबरे यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख अध्यक्षस्थानी होते. प्रेमानंद हुंबरे याच्या 'कुणाला खुर्ची, कुणाला मिर्ची' या कवितासंग्रहाचे प्रकाशनही सुर्वे यांच्या हस्ते झाले. विठ्ठल वाघ, उद्धव कानडे हेही उपस्थित होते.

### * राज्य ग्रंथालय अधिवेशन

ग्रामपंचायत स्तरावरील सार्वजनिक वाचनालये पुन्हा ग्रंथालय संचालनालयाकडे हस्तांतरित करावीत; ग्रंथालय मान्यता व अनुदानाचा प्रश्न जिल्हा नियोजनातून काढून राज्य नियोजन मंडळाकडे द्यावा, यासह पंधरा ठराव आळंदीतील ४८ व्या राज्य ग्रंथालय अधिवेशनात मंजूर करण्यात आले.

राज्यातील तीन हजार ग्रंथालये मान्यतेच्या व अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांच्या अनुदानाचा प्रश्न राज्य नियोजन मंडळात घ्यावा, त्यामुळे राज्यात ४० हजार गावांमध्ये वाचनालये सुरू होतील. यापूर्वी जिल्हा परिषदेकडे वर्ग केलेली ग्रामपंचायत स्तरावरील ग्रंथालये ग्रंथालय संचालनालयाकडे हस्तांतरित करावीत, गेल्या सहा वर्षांपासून अस्तित्वात नसणाऱ्या राज्य ग्रंथालय परिषदेची कायद्यात तरतूद करावी व समितीची फेररचना करावी. राज्यातील चित्रपट, नाटक, लोककलाकार, शेतमजूर यांच्यासारखेच निवृत्तिवेतन ग्रंथालय कर्मचाऱ्यांना मिळावे, राज्यातील संशोधन ग्रंथालयांना अनुदान देण्यात यावे, फिरत्या ग्रंथालयांसाठी अनुदानाची तरतूद करावी, शासनाने प्रत्येक जिल्ह्यात शासकीय जिल्हा ग्रंथालय स्थापना करून तेथे जिल्हा ग्रंथपाल नेमावा. गाव तेथे ग्रंथालय चळवळीसाठी ग्रंथनिधी उभारावा, सार्वजनिक ग्रंथालयांना स्वतःची जागा नसली तरी शर्ती पूर्ण करणाऱ्या ग्रंथालयांचा 'अ' वर्गात समावेश करावा, इमारत अनुदानाच्या मर्यादा वाढवाव्यात, व्यंकय्या पत्की समितीचा अहवाल स्वीकारावा, 'ग्रंथभेट' उपक्रम राबवून वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी ठरावांद्वारे करण्यात आली.

### * निराशा दूर करण्याचे 'गुड मॉर्निंग'मधून काम

''दुसऱ्यांच्या चुकांवर हसणे ही टवाळी असते, मात्र स्वतःच्या कृतीवर हसणे हा गुण आहे. 'गुडमॉर्निंग' या लेखसंग्रहात आनंद लाटकर यांचा हा गुण दिसतो. त्यांनी दैनंदिन जीवनात सामान्य माणसाची होणारी फसगत मांडली आहे. दिवसेंदिवस निराशेची वृत्ती मोठ्या प्रमाणावर वाढत असून, ती दूर करण्याचे काम आनंद लाटकर यांनी आपल्या लेखांतून केले आहे,'' असे डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी 'गुड मॉर्निंग' पुस्तकाचे प्रकाशन करताना सांगितले.

श्री. लाटकर म्हणाले,''या पुस्तकातून कट्ट्यावर कॉफी पीत गप्पा मारल्याचा 'फिल' येतो. सध्या आपण वेळेचे व्यवस्थापन करताना आपल्या भावनांचेही

व्यवस्थापन करत आहोत. आपल्या वागण्यात खोटेपणा येत आहे, वागण्यातील पारदर्शकता संपत आहे.''

*** 'कृपाछत्र'चे मुंबईत प्रकाशन**

दिलीप जोशीलिखित 'कृपाछत्र'या रामदास स्वामींच्या जीवनावरील कादंबरीचे प्रकाशन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते मुंबई येथे झाले. लोकसभेचे माजी सभापती मनोहर जोशी, राजाभाऊ रायकर, प्रकाशक प्राची चिकटे आणि गोविंदराव कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.

*** आता मोबाईलमध्येही 'सुपर कॉम्प्युटर'**

'ब्रॉडबॅण्ड' ही क्रांती आहे. त्यामुळे दूरचित्रवाणी, मोबाईल व संगणक एकाच उपकरणात उपलब्ध झाले आहेत. संगणकाची क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे...'सुपर कॉम्प्युटर' आता मोबाईलमध्येही मिळतील. दूरचित्रवाणीशीही लवकरच संवाद साधता येऊ शकेल... या अणि यापेक्षा प्रगत तंत्रज्ञानाचा आपल्याला वापर करायचा आहे, अशी अनेक विज्ञानाची शिखरे सर करण्यासाठी मानसिकता तयार करण्याचे आवाहन बिनतारी संदेश विभागाच्या अठ्ठावन्नाव्या वर्धापनदिनानिमित्त डॉ. विजय भटकर यांनी केले. पोलिस महासंचालक के. के. कश्यप, 'सिंबायोसिस'चे संचालक डॉ. शां. ब. मुजुमदार या प्रसंगी उपस्थित होते. या शतकातील 'ट्रान्झिस्टर', संगणक, 'मायक्रोप्रोसेसर' आदीं शोधांनी मानवाच्या आयुष्याची दिशाच बदलून गेली आहे. प्रगतीचा वेग प्रचंड वाढला आहे. विज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. रोज नवे शोध लागत आहेत. लक्षावधी लोकांशी एकाच वेळी बोलणे शक्य होणार आहे. हवा असलेला चित्रपट,दूरचित्रवाणीवरील मालिका मोबाईलवर पाहणे आता शक्य झाले आहे.

सामाजिक उपक्रमांत नागरिकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याबद्दल श्री. कश्यप यांनी खंत व्यक्त केली. पोलिस बिनतारी संदेश विभागाचे प्रमुख पी. टी. लोहार यांनी स्वागत केले. विभागात उत्कृष्ट कामगिरी बजावणारे निरीक्षक सुभाष पोतदार (अमरावती), प्रदीप कन्नलू (ठाणे शहर), फौजदार हरिभाऊ राजळे (मुंबई), रमेश काथार (औरंगाबाद), तुकाराम कांडाळकर (नांदेड), सहायक फौजदार अजित खरात, हवालदार कमलेश चव्हाण, लक्ष्मण जाधव व शिवाजी देवकर यांचा सत्कार करण्यात आला.

*** पहिले येरवडा साहित्य संमेलन**

''साहित्याचे नवे बियाणे पुन्हा रुजवायचे असेल, तर पुराणातील आदर्श नाकारण्याशिवाय पर्याय नाही. जीवनाचे क्षेत्र मोठे असेल, तरच साहित्याचे क्षेत्रही मोठे होईल. यातून नवा विचार देणारे साहित्य निर्माण होईल,'' अशी अपेक्षा पहिल्या येरवडा विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गंगाधर पानतावणे यांनी व्यक्त केली.



प्रसिद्ध कादंबरीकार ह. मो. मराठे यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. महापौर रजनी त्रिभुवन, आमदार चंद्रकांत छाजेड, बाळासाहेब शिवरकर, शरद रणपिसे, स्थायी समितीच्या अध्यक्षा संगीता देवकर, नगरसेवक जॉन पॉल, सुनील मलके आदी उपस्थित होते.

डॉ. पानतावणे म्हणाले, ''साहित्यातून आलेले नवे विचार समाजाच्या व संस्कृतीच्या अंत:कोषात आत्मविश्वास आणि आशावाद निर्माण करीत असतात. जीवनाला आणि मानवी कर्तृत्वाला नवे आकाश व नव्या उजेडवाटा देण्याचे कार्य परिवर्तनवादी विचार करत असतात. नवा विचार हा नवीन जीवनाचा शिल्पकार आहे, याची जाणीव लेखकांनी, विचारवंतांनी ठेवायलाच हवी.''

श्री. मराठे म्हणाले, ''साहित्य क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप नकोच. परंतु राजकीय व्यक्तीला साहित्याची आवड असू शकते. त्यामुळे त्यांचा सहभाग असावा, हस्तक्षेप नसावा. या संमेलनात सर्व क्षेत्रांतील साहित्यप्रवाह एकत्र आले आहेत. सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचू लागले आहे याचे हे संमेलन द्योतक आहे. नव्या साहित्याची सर्व थरांतून निर्मिती होत आहे. परंतु लेखकांपेक्षा समाजालाच भयावह अनुभवातून जावे लागत आहे. यामुळे वाचकांचीही आवड बदलत आहे. लोकांना जगायला उपयोगी पडेल अशा साहित्याची मागणी वाढत आहे. नव्याने येणाऱ्या साहित्यात प्रगल्भता हवी. लेखकांनी जीवनाचा नवा आशय वाचकापुढे ठेवायला हवा.''

स्वागताध्यक्ष ॲड. अविनाश साळवे, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मनोहर जाधव, मुख्य समन्वयक प्रा. रतनलाल सोनग्रा, निमंत्रक जयंत फडके उपस्थित होते.

*** दुर्मिळ हस्तलिखितांचे जतन करण्यासाठी प्रशिक्षण**

प्राचीन भारतीय ज्ञान आणि परंपरा यांचे महत्त्व सांगणारी हस्तलिखिते हीच देशाची खरी संपत्ती आहे आणि म्हणूनच ती जतन केली पाहिजे, या भूमिकेतून भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था आणि हस्तलिखित जतन केंद्र यांनी सहा दिवसांचे अभ्यास शिबिर आयोजित केले होते. त्यात ३० अभ्यासक आणि ग्रंथपाल सहभागी झाले होते.

भांडारकर संस्थेच्या मानद सचिव डॉ. सरोजा भाटे म्हणाल्या की, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी विखुरलेल्या आणि दिवसेंदिवस अधिकाधिक जीर्णशीर्ण होत असणाऱ्या हस्तलिखितांचा समृद्ध खजिना कमीत कमी खर्चात जतन करण्याचे तंत्रज्ञान विशद करण्यासाठी हे अभ्यासशिबिर आहे.

देशपातळीवर याविषयावर जागृती व्हावी यासाठी केंद्र सरकारने दोन वर्षांपूर्वी नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्टस् (हस्तलिखित स्रोत आणि जतन) हा प्रकल्प स्थापन केला. त्यातूनच भांडारकर संस्थेसह देशात ठिकठिकाणी हस्तलिखितांचे संकलन आणि जतन याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले आहेत.

भुवनेश्वरच्या मल्लिका मित्रा, तिरुअनंतपुरमचे पी. पेरुमल तसेच भांडारकर

संस्थेचे हस्तलिखित जतन विभागाचे प्रमुख श्रीनंद बापट यांनी मार्गदर्शन केले.

शिबिरासाठी केंद्र सरकारतर्फे ७५ हजार रुपये मंजूर करण्यात आले होते. जुनी हस्तलिखिते आणि पोथ्या यांचे जतन करण्यासाठी लायनिंग, फ्युमिगेशन, ब्रशिंग आणि डीॲसिडीफिकेशन अशा शास्त्रशुद्ध प्रक्रिया शिकवण्यात आल्या. भूर्जपत्रावर लिहिलेले लिखाण अस्पष्ट होते, ते रिइंकिंग या पद्धतीने पुन्हा सुस्पष्ट करण्याचे तंत्रही समजावून देण्यात आले.

*** 'नारायण विद्यापीठा'ला जनस्थान सन्मानाची 'सनद'**

कुठल्याही प्रस्थापित विद्यापीठाची पायरीही न चढलेल्या; पण तुमच्या आमच्यासारख्या सामान्य माणसांचे सुख-दुःख, त्यांची रोजची लढाई, कवितेतून मांडणाऱ्या 'नारायण गंगाराम सुर्वे' नावाच्या कलंदर 'विद्यापीठा'ला जनस्थान पुरस्कार कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी २७ फेब्रुवारी रोजी प्रदान केला.

श्री. उत्तम कांबळे म्हणाले,''जीवनातील वाटावळणे पचवत, खडतर जीवन जगत त्यांची कविता पुढे जात राहिली. सर्वसामान्यांचा चेहरा हिसकावणारी व्यवस्था बदलण्याचा विचार करणारी, त्याच वेळी तुच्छतेची गावं शब्दांच्या घावांनी नष्ट करताना माणसाचं महन्मंगल स्तोत्रे गात, माणसांचा गाव तयार करणारी त्यांची कविता आहे; त्यामुळे त्यांच्या कवितांवर मराठीत जेवढी चर्चा झाली, तेवढीच चर्चा त्यांच्या काव्यसंग्रहांवरील मुखपृष्ठांवर झाली.'' कांबळे यांनी 'हे नारायणा' ही स्वरचित कविताही ऐकविली.

श्री. धर्माधिकारी म्हणाले,''जाती-धर्माचा म्हणून जगता येते, तसे माणूस म्हणून जगता येत नाही का, असा या माणसाचा प्रश्न आहे. या माणसाच्या कवितेत घामाचा जो सुगंध आहे, तो अन्य कोणत्याही अत्तरात मला सापडलेला नाही. श्रमाच्या प्रतिष्ठेसाठी त्यांची कविता आहे. मार्क्सच्या विचारांना कवितेत पेरणाऱ्या सुर्वेंची कविता ही याच शोषित व गरिबांच्या बंडांची प्रेरणा आहे. म्हणून ती खूप मोठी आहे, असे मी मानतो.''

पुरस्कार वितरणानंतर सुर्वे म्हणाले, ''नाशिकशी माझे ऋणानुबंध तात्यासाहेबांनीच (कुसुमाग्रज) जुळवून दिले. माझ्या 'ऐसा गा मी ब्रह्म' या पहिल्या काव्यसंग्रहाला त्यांनीच प्रस्तावना लिहिली. मला माझ्या मातेचं नाव माहीत नाही, पण मी तिच्याबद्दल कधीही विखारी बोलूच शकत नाही... ज्या देशात दर वर्षी दोन लाख मुलं रस्त्यांवर, फूटपाथवर, मंदिराच्या पायऱ्यांवर, स्थानकांवर टाकून दिली जातात, त्या देशात माझ्यासारख्या मुलाला गंगाराम सुर्वे नावाच्या गिरणी कामगारानं उचललं नसतं, शाळेत पाठवलं नसतं, तर त्याला नाव मिळालं नसतं, तात्याही भेटले नसते आणि आज त्यांच्या नावाचा पुरस्कारही मिळाला नसता,' माझ्या पहिल्या काव्यसंग्रहापासून माझ्या पाठीशी तात्यासाहेब उभे राहिले. त्यांनीच माझ्या पहिल्या इंग्रजी पुस्तकालाही प्रस्तावना लिहिली. तात्यासाहेबांनीच माझ्या मुलासाठी मुलगी पाहिली.''

श्री. सुर्वे म्हणाले, ''उभ्या-आडव्या ओळी लिहिल्या की झाला कवी, हे मला मान्य नाही. कविता हवी तात्यासाहेबांसारखी. ती देशाचं भूषण ठरली.''

*** क्रांती घडविण्यासाठी प्रत्येक समस्येवर दहा चित्रपट हवेत**

''मी 'स्वदेस'च्या निमित्ताने देशभर विविध ठिकाणी हिंडलो. तेथील प्रश्न समजावून घेतले. या देशातले सामाजिक प्रश्न एवढे मोठे आहेत, की क्रांती घडविण्यासाठी चित्रपटसृष्टीने प्रत्येक समस्येवर किमान दहा चित्रपट बनवायला हवेत,'' असे मत दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी पुणे येथे व्यक्त केले.

'केसरी'च्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवानिमित्त गोवारीकर यांची मुलाखत समर नखाते, श्रीरंग गोडबोले, संजय दिनकर, डॉ. केशव साठे व सुहास घटवाई यांनी घेतली.

विविध प्रश्नांना उत्तरे देताना गोवारीकर यांनी 'स्वदेस'च्या निर्मितीचा आढावा घेतला. शाहरूख खानची निवड 'मोहन भार्गव'च्या भूमिकेसाठी करण्याचे कारण सांगताना ते म्हणाले, ''आमीर खान या भूमिकेसाठी चालला नसता. कारण 'लगान'नंतर त्याची प्रतिमा मोठी झाली आहे. शाहरूखबाबत प्रेक्षकांच्या मनात वेगळे चित्र आहे. मला त्याची हीच प्रतिमा चित्रपटासाठी वापरायची होती.

''गीता या पात्राच्या भूमिकेसाठी अनेक अभिनेत्री डोळ्यांपुढे होत्या. पण मला 'मोहन भार्गव'च्या दृष्टीतून गावाचे दर्शन घडवायचे होते. त्यामुळे मी गीताच्या भूमिकेसाठी नव्या चेहऱ्याची निवड केली. संगीतकार म्हणून ए. आर. रेहमानचे वेगळेपण आहे. रेहमानला ईश्वरी वरदान आहे. पहाटे पाच वाजता मेणबत्ती लावून तो सिंथेसाइझरवर बसला, की गाण्याचे संगीत निश्चित झाले असे आपण समजायचे. त्याला पार्श्वसंगीताचा विचार प्रथम सुचतो,'' असे गोवारीकर यांनी सांगितले.

एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले, ''तीन तासांच्या आत संपेल असा चित्रपट बनवणे हे माझे स्वप्न आहे. पण केवळ भाषणबाजी मला आवडत नाही. म्हणून 'स्वदेस'मध्ये मी काही करमणूकप्रधान दृश्ये ठेवली. मराठी चित्रपट बनवायला मला आवडेल. त्यासाठी दोन कोटी रुपये लागतील; पण महाराष्ट्रात एकाच दिवशी ५० चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होऊन दोन कोटी वसूल करून देऊ शकला, तरच मी मराठी चित्रपट बनवीन. मराठी चित्रपटाच्या निर्मितीअगोदर मला या चित्रपटांच्या वितरण यंत्रणेचा अभ्यास करायचा आहे.''

अकबर आणि जोधाबाई यांच्या जीवनावर पुढील चित्रपट बनवीत असल्याचेही गोवारीकर यांनी सांगितले.

*** उंडाळेचा शब्द उत्सव**

'मातीसाठीच जगावं, मातीसाठीच मरावं,
बाळा...माती लई थोर, तिला कसं इसरावं...'

भुईतून उगवलेली वेल वाटावी, अशी कविता. शब्द कधी रानफुलांचा गंध देणारे, तर कधी निवडुंगाचा डंख भासणारे अन् समोर मंत्रमुग्ध झालेला रसिक जनांचा मेळा... महाराष्ट्राच्या दुसऱ्या फळीतील प्रतिभेचा मळाच जणू उंडाळे येथील समाजप्रबोधन साहित्य संमेलनातील कविसंमेलनात बहरला. उंडाळकर विद्यालयाच्या मैदानावरील या शब्द-फुलांच्या मैफलीचे अध्यक्ष होते मराठवाड्याचे इंद्रजित भालेराव, तर सूत्रसंचालन करत होते गोव्याचे विष्णूसूर्या वाघ. आंबेजोगाईचे दिनकर जोशी, नगरच्या सौ. प्रतिभा टेपाळे-महाजन व स्थानिक शाहीर थळेंद्र लोखंडे यांनी रसिकांना खिळवून ठेवलं.

'आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने' या तुकोबांच्या ओळी आठवतच वाघ यांनी कविसंमेलनाला सुरवात केली.

'सोनियाचा पिंपळ, झडू लागल ज्ञानदेव समाधीत रडू लागला'

हे गाणं दिनकर जोशींनी सादर केलं.

'मी नभाला पुसले आता, माझे ओले डोळे।
झेलित बसलो माती मधुनी, दुष्काळी हिंदोळे।
झाडाखालची जीर्ण सावली ओढून नेली कोणी।
पक्ष्यांच्या या पंखामधली, झडली ओली गाणी।

इंद्रजित भालेराव यांनी मातीबद्दलची ओढ कमी होत चालल्याची खंत व्यक्त करताना म्हटले.

काट्याकुट्यांचा तुडवीत रस्ता। जरा गावाकडं चल माझ्या दोस्ता।
कशी उन्हात, तळतात माणसं। कशी मातीत मळतात माणसं।
पर त्यांच्या घामाचा भाव लंय सस्ता।।
या मातीचा मूळ अधिकारी      बाप झालाय आता भिकारी
गाव असून झालाय फिरस्ता।।

अन्याय सोसायला शिकलेल्या शेतकऱ्यांच्या पोराला त्यांनी सल्ला दिला.

'शिक बाबा शिक, लढायला शिक
कुणब्याच्या पोरा आता जगायला शिक.
आत्महत्या नको, हत्या करायला शिक,
मरू नको आता मारायला शिक

विष्णूसूर्या वाघ राजकारणी अन् साधू महंताना आपल्या खास शैलीत 'चिमटे' घेत वातावरण हलकेफुलके ठेवले.

शंकराचार्यांना पोलिस कोठडी, केल्या कर्माचा भोग आहे,
माणुसकीच मरत असेल तर धर्माचा काय उपयोग आहे?'

असा सवाल त्यांनी केला. स्त्रियांच्या व्यथा सांगताना टेपाळे यांनी 'मी सांधते, बांधते, लिपते, सर्व दुराव्याला. स्वत;च्या कातडीचं, ठिगळ लावते,' असं सांगितलं, तर थळेंद्र लोखंडे यांनी कारगिलचा पोवाडा सादर केला. 'मास्तर



मी एवढ्यासाठीच दारू पितो' या कवितेला उपस्थितांची चांगलीच दाद मिळाली.

प्रकाश पाटील यांच्या 'शब्द' या कवितासंग्रहाचे प्रकाशन भालेराव यांच्या हस्ते झाले. कविता ऐकून ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक दादा ठाकरे यांनी १०१ रुपयांचे बक्षीस दिले. ती रक्कम कवी मंडळींनी प्रकाश पाटीलला दिली.

### * तुकोबांच्या अभंगाला ७० देशांमधील वाचक!

मराठीतील पहिले विद्रोही कवी संत तुकाराम यांची ३९७ वी जयंती साजरी झाली. www.tukaram.com या संकेतस्थळावर विविध भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आलेल्या अभंगांचे वाचन जगातील सुमारे ७० देशांमधून होत आहे, असे या संकेतस्थळावर काम करणारे दिलीप धोंडे यांनी सांगितले.

साहित्य अकादमीने तुकारामांच्या निवडक ५०० अभंगांचे पुस्तक काढले असून त्याचे संपादन डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले आहे. पुणे विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनाच्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करण्याचे कामही चालू आहे. चीन, पॅलेस्टाइन, सुदान, इराण, इस्त्राइल सारख्या देशांमधूनही हे संकेतस्थळ पाहणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

तुकाराम झालेच नसते तर मराठी भाषा खरोखरच दरिद्री राहिली असती, असे मत नेमाडे यांनी 'तुकाराम गाथा : निवडक अभंग' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत व्यक्त केले आहे. तुकोबांच्या अभंगातील बराच भाग हा जातीयतेविरुद्ध आणि संकुचित धार्मिकतेविरुद्ध शस्त्र उगारणारा आहे. प्रतिकूल परिस्थितीशी झगडत गृहस्थ, कवी, भक्त आणि संत अशा पायऱ्या चढलेल्या तुकारामांसारखे व्यक्तिमत्त्व क्वचितच  आढळते.

तुकारामांनंतर त्यांच्या अभंगांच्या वह्याही नाहिशा झाल्या. त्यानंतर शंभर वर्षांनी एक थोर तुकारामभक्त वारकरी त्रिंबक कासार यांनी चाळीस वर्षे गावोगाव हिंडून मौखिक स्वरूपात विखुरलेले अभंग पहिल्यांदा एकत्र लिहून ठेवले. १८६९ मध्ये एक तुकारामभक्त इंग्रज अधिकारी सर अलेक्झांडर ग्रांट याने पुढाकार घेऊन ४५०० अभंगांची गाथा प्रकाशित केली. हीच संहिता अधिकृत मानली जाते. पण ती पूर्ण निर्दोष नाही, असे मत नेमाडे यांनी व्यक्त केले.

### * जवाहरलाल नेहरू विद्यापीठात मराठी अभ्यासकेंद्र

मराठी भाषेचे महाराष्ट्रातून दिल्लीत सीमोल्लंघन नक्कीच होईल, तुम्ही निश्चिंत राहा, असे आश्वासन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दिल्लीत दिले. राजधानीतील सुविख्यात जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय विद्यापीठामध्ये (जेएनयू) तामिळपाठोपाठ मराठी भाषेचेही अभ्यास केंद्र (स्टडी सेंटर) सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार या दोघांनीही तातडीने पावले उचलण्याचे ठरवले आहे.

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या 'जेएनयू'मध्ये अनेक विदेशी भाषांच्या अध्ययनाची सोय आहे. भारतीय भाषांमध्ये हिंदी या एकमेव भाषेचा स्वतंत्र विभाग आणि

संस्कृतचे अभ्यास केंद्र आहे. जानेवारी महिन्यात प्रथमच तामिळ भाषेचे अभ्यासकेंद्र राज्यसभा सदस्य जयराम रमेश यांच्या पुढाकाराने सुरू झाले. मुख्यमंत्री जयललितांनी त्यासाठी ५० लाख रुपये दिले.

केंद्रातल्या यूपीए सरकारने तामिळला शास्त्रीय भाषेचा दर्जा देऊन यापूर्वीच सन्मानित केले आहे. याच धर्तीवर मराठी भाषेचेही सीमोल्लंघन जेएनयूतल्या अभ्यासकेंद्राने व्हावे, म्हणून पाठपुरावा करण्याची गरज आहे.

*** सातारा येथे चर्चासत्र : बदलते वास्तव आणि लेखक**

लेखकांनी समग्र व वास्तववादी साहित्याची निर्मिती केल्यास साहित्य क्षेत्रातील समस्यांवर मात करता येईल, असे मत डॉ. भा. ल. भोळे यांनी व्यक्त केले.

सातारा येथे 'बदलते वास्तव आणि लेखकांपुढील आव्हाने' या विषयावरील चर्चेत ते पुढे म्हणाले, आजच्या काळात साहित्यापुढे अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. साहित्य क्षेत्रात शिरलेल्या बाजारीकरणामुळे भाषेचे सपाटीकरण झाले आहे. मनस्वीपणे साहित्य निर्मिती करण्यावर गदा आली आहे. बदलत्या वास्तवाची आव्हाने पेलण्याची लेखकाची तयारी दिसत नाही. आज वास्तवाला इतिहासविरहीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशा परिस्थितीत लेखकाने आपल्या अनुभवांमध्ये समकालीन वास्तवाला इतिहासबद्ध करून त्याला वाङमयीन व्यक्तिमत्त्व देणे गरजेचे झाले आहे.

साहित्यिकांची संवेदनशीलता आणि समकालीन वास्तव यांचे नाते अतूट व बहुपदरी असते. जीवनविषयक दृष्टी, अनुभव ग्रहण पद्धती आणि प्रतिभा धर्म यांचा अंतर्भाव लेखकाच्या संवेदनशीलतेत असतो, असे सांगून ते पुढे म्हणाले, केवळ भोगलेले क्षण साहित्यकृतीतून प्रतिबिंबित करण्याऐवजी बाह्यविश्वाचे अंतरीकरण करून, कल्पनेद्वारे साहित्यात त्याची पुनर्रचना केली पाहिजे. वास्तव आणि समकालीन गोष्टींचा अर्थ समजावून घेतला पाहिजे.

नव्या उमेदीचे लेखक काळाला आव्हान न देता त्या आव्हानाच्या दहशतीपुढे मान झुकवतात. त्यामुळे साहित्याकडून मुक्तीकडे घेऊन जाणारे परिप्रेक्ष्य हाती यावे अशी इच्छा असणाऱ्या वाचकांची घोर निराशा होते अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

या चर्चासत्रात सुनीता देशमुख, शशिकांत तासगावकर, प्रदीप पाटील, प्रा. राम बापट, प्रा. एस. ए. शेख, एकनाथ पाटील, सायमज मार्टिन, नॉबी आरमेडा, विजय माळी, वि. बा. जगताप, प्रा. शामसुंदर मिरजकर, रमेश उमादकर, आसावरी काकडे, प्रवीण चव्हाण, वंदना भागवत, प्रा. सौ. रामकली पावसकर, प्रा. शैला सायनाकर, प्रा. प्रकाश बारटक्के यांनी भाग घेतला.

आपल्याकडे भाषेचे भांडवल आहे. समाजातील वेदना, दुःखे दूर करण्यासाठी लेखकांनी सामाजिक, राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे उतरावे, असे मत ज्येष्ठ समीक्षक प्रा. राम बापट यांनी समारोपप्रसंगी व्यक्त केले.

प्रा. बापट म्हणाले, ''लेखक हा ललितलेखन करणारा बुद्धिजीवी घटक असतो. आपला देश विषमतेने गांजलेला देश आहे. या देशातील बुद्धिजीवी आणि विकसित



देशांतील बुद्धिजीवी घटक यामध्ये मोठा फरक आहे. आपल्याकडे समृद्ध भाषेचे भांडवल आहे. लेखकांनी समाजातील वेदना, दुःखे दूर करण्यासाठी उतरले पाहिजे.''

डॉ. भोळे म्हणाले, ''कोणतीही चर्चा किंवा विधान अंतिम नसते. आज लेखक स्वतंत्र प्रज्ञेने वास्तवाचा वेध घेत आहेत. वास्तवाचे पदर अत्यंत गुंतागुंतीचे आणि भेडसावणारे आहेत. आपण त्यास सामोरे जात आहोत.''

*** मायक्रोसॉफ्टचे मराठी सॉफ्टवेअर स्वस्तात उपलब्ध होणार**

मायक्रोसॉफ्टच्या इंग्रजी विंडो सॉफ्टवेअरपेक्षा मराठीसह १४ भारतीय भाषांचे विंडो ऑफिस सॉफ्टवेअर २५ ते ३० टक्के कमी दरात उपलब्ध होणार आहे, असे मायक्रोसॉफ्ट कार्पोरेशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष रवी व्यंकटेशन यांनी जाहीर केले.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रशिक्षण परिषदेच्या आवारात महाराष्ट्र सरकारबरोबर भागीदारी करून पहिल्या आयटी ॲकॅडमीची सुरुवात मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, देशातील गरीब जनतेपर्यंत आयटी शिक्षण आणि संगणक साक्षरता पोचण्यासाठी मायक्रोसॉफ्टचे युपीएस, जोडणी, हार्डवेअर, सॉफ्टवेअर हे सर्वसामान्यांना परवडेल अशा दरात देण्याची भूमिका आहे. यातूनच 'लो कॉस्ट पीसी'चे स्वप्न साकार होऊ शकेल, असे सांगून व्यंकटेशन म्हणाले की, ज्ञानाबरोबरच मनोरंजन तसेच संज्ञापन यासाठी पीसीटीव्हीटी (पर्सनल कम्प्युटर, टेलिव्हिजन आणि टेलिफोन एकत्र असणारे युनिट) हे ग्रामीण भागात परवडेल अशी सुविधाही मायक्रोसॉफ्टतर्फे विकसित होत आहे. शेतकऱ्याला यातूनच समृद्धीचा मार्ग सापडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माहितीतंत्रज्ञान आणि कम्प्युटरचा ज्ञानार्जनासाठी वापर हा बालवाडी ते पीएचडीपर्यंत एक कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. व्यंकटेशन म्हणाले की, 'इमॅजिनर्स' सारख्या स्पर्धेतून नव्या कल्पनांना उत्तेजन, विद्यापीठे तसेच शैक्षणिक संस्थांच्या सहकार्यातून आयटी क्षेत्रातील संशोधन, महिलांना इंजिनियरींग आणि आयटीमध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहन अशा योजना राबवण्यात येणार आहेत.

भारतात आयटीमध्ये असणारी आर्थिक गुंतवणूक कमी असून ती वाढायला हवी तसेच सॉफ्टवेअरच्या बाबतीतही वाढलेली चाचेगिरी थोपवणे हे एक मोठे आव्हान आहे, असे त्यांनी सांगितले. प्रादेशिक भाषांमध्ये आयटी ॲकेडमीचा अभ्यासक्रम तयार करण्याचे काम सुरू आहे. मराठीतील अभ्यासक्रम पूर्णत्वाच्या मार्गावर असून त्याची लौकरच अंमलबजावणीही होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

*** महाराष्ट्र कवी यशवंत**

महाराष्ट्रकवी यशवंत दिनकर पेंढरकर उर्फ कवी यशवंत यांच्या चाफळ या मूळ गावी त्यांचे स्मारक उभारण्याचे काम गेल्या १० वर्षापासून रेंगाळत पडले आहे. कवी यशवंत यांना महाराष्ट्र विसरला आहे की काय हा प्रश्न कवी यशवंतांच्या १०६व्या जयंतीच्यानिमित्ताने पुन्हा एकदा ऐरणीवर आला.

'आई म्हणोनी कुणी, आईस हाक मारी, स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी' या कवितेने एक काळ गाजवला होता. रविकिरण मंडळातील ज्या सप्तर्षींनी

मराठी कविता जनसामान्यांपर्यंत पोहोचवली, त्यामध्ये कवी यशवंत यांचा समावेश होता. यशोधन, यशोगिरी; ओजस्विनी, पाणपोई आदी काव्यसंग्रह, बंदीशाळासारखे खंडकाव्य, शिवराय हे महाकाव्य लिहून मराठी भाषेचे भूषण ठरलेल्या कवी यशवंतांच्या स्मारकाबाबत अद्यापही उदासीनता दिसत आहे. कवी यशवंत स्मारक समितीचे अध्यक्ष माजी सार्वजनिक बांधकाममंत्री विक्रमसिंह पाटणकर हे आहेत. २६ मार्च १९९५ रोजी या कार्याला मूर्तस्वरूप देण्यासाठी चाफळ येथे बैठक झाली. त्यावेळी कवींचे पुतणे ॲड. शिरीष पेंढारकर यांनी स्मारकासाठी ४ गुंठे जागा दान दिली. गेल्या १० वर्षापासून ही जागा स्मारकाच्या प्रतीक्षेत आहे. महाराष्ट्रकवी व तत्पूर्वी बडोदा संस्थानचे राजकवी म्हणून गौरविलेल्या कवी यशवंतांचे स्मारक त्यांच्या मायभूमीत झालेच पाहिजे, यासाठी चाफळ येथे १९९७ मध्ये 'कवी यशवंत प्रतिष्ठान'ची स्थापना केली. या प्रतिष्ठानची धुरा माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्याकडेच आहे. तत्कालीन आमदार अरुण मेहता व रामदास फुटाणे यांनी १०१ व्या जयंतीच्या कार्यक्रमात आमदार निधीतून तीन लाख रुपयांचा निधी प्रतिष्ठानला जाहीर केला. मात्र शासनाने नियमाकडे बोट दाखवून असा निधी खाजगी प्रतिष्ठानला देता येत नाही, अशी भूमिका घेतली. विधान परिषदेत अरुण मेहता यांनी कायद्यात बदल होत नसेल, तर तो कायदा काय कामाचा असा सवाल केला. विधानपरिषदेचे अध्यक्ष ना. सं. फरांदे यांनी प्रतिष्ठानला शासनामार्फत ५ लाख रुपये देण्याचे मान्य करतानाच जुन्या कायद्यात दुरुस्ती घडवून आणली.

### * 'मुलांचे म्युझियम'

पर्यावरण तसेच विज्ञानक्षेत्रामध्ये जागृती व्हावी, म्हणून पुणे महापालिकेने 'मुलांचे म्युझियम'या ६० लाख रुपये खर्चाच्या प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. अमेरिकेतील बोस्टनच्या मुलांच्या म्युझियमच्या धर्तीवरील हे देशातील पहिलेच केंद्र ठरेल.

दत्तवाडी भागात पुणे महापालिकेच्या डांबर कोठी या ठिकाणी म्युझियमचे बांधकाम सुरूही झाले आहे. याचा आराखडा प्रसिद्ध लॅण्डस्केप डिझायनर शोभा भोपटकर यांनी तयार केला आहे. या कामाची जबाबदारी सेंटर फॉर एनव्हायरमेंटल एज्युकेशन (सीइइ) तसेच भारती विद्यापीठाच्या पर्यावरण संशोधन शाळेवर सोपवण्यात आली आहे.

उपक्रमांच्या आयोजनाची जबाबदारी शाळकरी मुला-मुलींवर सोपवण्याची कल्पना आहे. तसेच येथील वस्तू आणि उपकरणे यांची माहिती सांगण्यासाठी शहरातील ज्येष्ठ नागरिकांनाही सहभागी करून घेतले जाणार आहे.

### * 'समाजाला वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ करण्याचे वृत्तपत्रांचे सामर्थ्य'

''इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या चौफेर आक्रमणांच्या काळातही वृत्तपत्रांचे महत्त्व अबाधित राहणार आहे. समाजाला वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ करण्याचे सामर्थ्य हे वृत्तपत्रांमध्येच आहे,'' असे प्रसिद्ध पत्रकार राजू परुळेकर यांनी संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागात सी. रो. जगझाप स्मृती समिती आयोजित 'वृत्तपत्रे विरुद्ध इलेक्ट्रॉनिक माध्यमे'या विषयावर बोलताना स्पष्ट केले.



श्री. परुळेकर म्हणाले, ''वृत्तपत्रांचा चेहरा बदलत आहे. त्यामध्ये मांडणी व सजावट ही महत्त्वाची गोष्ट होऊन बसली आहे. हे एका बाजूने स्वागतार्ह आहे; पण मजकुराकडे मात्र बऱ्याच वेळा दुर्लक्ष होताना दिसत आहे.''

''इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे सामर्थ्य एखादी घटना वेगाने पसरवण्यात आहे; पण त्याच वेळी कोणतीही घटना रंजकपणे दाखवणे, हाही त्यांच्या कार्यप्रणालीचाच भाग झाला आहे, भीषण घटना रंजकतेच्या साच्यातून सातत्याने दाखवणे यामुळे बघणाऱ्यांच्यातही कोडगेपणा आला. परंतु आता या वाहिन्या त्यांच्यातील स्पर्धेमुळे यातून बाहेर येणे अशक्य आहे.''

### * नामदेव ढसाळ यांचा सत्कार

'साहित्य अकादमी'ने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल नामदेव ढसाळ यांचा दलित पँथरच्या वतीने ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते पुणे येथे १६ मार्च रोजी सत्कार करण्यात आला.

''माझ्या मनगटातील जोर आणि जिभेचे बळ हे त्या भीमरायाचे आहे,'' असे सांगून ढसाळ म्हणाले,''आंबेडकर नसते, तर आम्हीही नसतो. पण त्यांना आम्ही फार छोटे करून टाकले आहे. त्यांचा विचार सर्वच पातळ्यांवर नष्ट करीत आहोत. बदलता काळ लक्षात घेऊन आंबेडकरी चळवळ योग्य वाटेवर ठेवण्याची गरज आहे. आमचे सैन्य समाजवाद्यांच्या, साम्यवाद्यांच्या, रिपब्लिकन पक्षाच्या झेंड्याखाली दिसत आहे. लोक आता शिवधर्माच्या मागे लागले आहेत. हा चुकीचा मार्ग आहे. आर्य व अवैदिकांचा संकर ही माझी संस्कृती आहे. ही संस्कृती न विसरता मी अवैदिकांचा पाठीराखा आहे. मी कवी म्हणून शेवटपर्यंत लढेनच; पण आंबेडकरांचे वर्गविहीन, जातिविहीन समाजाचे स्वप्न पूर्ण झाल्याशिवाय माझ्या कवितेला अर्थ नाही. मी पेरले आहे आणि आता प्रतिक्षेत आहे.''

''संसद ही सर्व दु:खे नष्ट करू शकेल, असे मानता कामा नये. नव्या पिढीने केवळ संसदीय राजकारणावर विसंबून राहता कामा नये. आंबेडकरी विचारांचे उत्तरदायित्व स्वीकारलेल्यांनी लढाई पुढे सुरू ठेवायला हवी होती. पण सर्व अस्पृश्यांची, समस्त गरिबांची चळवळ व्हावी, या बाबासाहेबांच्या अपेक्षेपासून चळवळ दूर गेली. त्यांनी सारी चळवळ संसदीय राजकारणाच्या दावणीला बांधली. सत्ता सौदेबाजी करीत आंबेडकरी चळवळ संकुचित बनवली. त्यामुळे दलितांचे प्रश्न सुटू शकले नाहीत. आंबेडकरी चळवळ म्हणजे सांस्कृतिक मूल्यांचा लढा आहे. म्हणून सांस्कृतिक बळ उभे करणे गरजेचे आहे. पारंपरिक हिंदू बदलत असताना जुनी शस्त्रे व जुनाच शत्रू समोर ठेवून लढता येणार नाही. तसेच, आंबेडकरांचे नाव घेत सूडाचे राजकारण करू नका. बाबासाहेबांना नवा माणूस घडवायचा होता, याचे भान ठेवा,'' असेही त्यांनी बजावले.

प्रा. जाधव म्हणाले,''कविता केवळ रंजनासाठी लिहिली जात नाही. तो संस्कृतीची उद्गाती असते. जग बदलण्याचे सामर्थ्य कवीपाशी असते. ही जबाबदारी जाणणाऱ्या ढसाळांची कविता आंबेडकरवाद समजावून सांगणाऱ्यांसाठी आधाराला होती.''

श्री. अनंत दीक्षित म्हणाले,''माणसाच्या मनातील तहानेचे वाङ्मयातून प्रतिनिधित्व करणारी राजकीय जाणिवेची कविता ढसाळ यांनी लिहिली. जगण्याच्या पसाऱ्यातून येणारी ही कविता अवघ्या सृष्टीलाच हात घालते.''

अरुण भालेराव यांनी प्रास्ताविक केले. शुभांगी शिंदे व नितीन सरोदे यांनी सूत्रसंचालन केले.

*** बारावे कामगार साहित्य संमेलन**

माणसांमाणसांमधील नात्यांवर, जिव्हाळ्यावर संस्कृती टिकते. कष्ट करणाऱ्यांची जात एकच असते. समाजातील गरीब, दुर्लक्षित लोकांना सुविधा कशा मिळतील, याकडे पांढरपेशावर्गाने लक्ष दिले पाहिजे. साहित्यिकांनी पांढरपेशावर्गाचा विचार न करता गरीब लोकांचा विचार केला पाहिजे. पांढरपेशावर्ग देशाचा इतिहास घडवीत नसतो, तर कामगारकष्टकरीवर्गच देशाचा इतिहास घडवीत असतो, असे प्रतिपादन डॉ. अनिल अवचट यांनी सोलापूर येथे कामगार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आयोजित १२ व्या कामगार साहित्य संमेलनाचे कवी कुंजविहारी सभागृहात कामगार राज्यमंत्री नवाब मलिक यांच्या हस्ते उद्घाटन झाले. नवाब मलिक म्हणाले, की सोलापूर शहरातील हुतात्म्यांनी स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. कामगार जेव्हा साहित्यकार होतो तेव्हा तो तळपती तलवार होतो. साहित्य संमेलनातून एक नवी दिशा कामगारांना मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सोलापुरातील साहित्यिक रा. श्री. पंचवाघ, दत्ता हलसगीकर, लक्ष्मीनारायण बोल्ली, बाबूराव मैंदर्गीकर, मुबारक शेख, प्रा. पाटील, पांडुरंग काळे, माधव पवार, शोभना सागर यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अजिज नदाफलिखित 'गीतछत्र' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

*** मराठी आणि 'आयटी'ची अनोखी दोस्ती**

मराठी भाषा आणि 'आयटी'नं एकमेकांच्या हातात हात घालून पुढं गेलं पाहिजे, म्हणून पुणे विद्यापीठानं दोन्ही विषयांना एकाच व्यासपीठावर स्थान देऊन एक वेगळा पायंडा पाडला.

पुणे विद्यापीठाच्या ज्ञानेश्वर सभागृहात मराठी विभागातर्फे 'साहित्य संशोधन : स्वरूप आणि समस्या' या विषयावर चर्चासत्र आयोजिण्यात आलं होतं. दोन दिवसांपूर्वीच त्यांनी यासाठीची परवानगी घेतली होती. मात्र, केंद्रीय दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री दयानिधी मारन पुण्यात आल्यानं त्यांच्या हस्ते 'वाय-फाय'चं उद्घाटन करून घ्यावं आणि तेही ज्ञानेश्वर सभागृहात, असं ठरलं. मराठी विभागाला तशा सूचनाही मिळाल्या; मात्र चर्चासत्राला उपस्थित प्रतिनिधींना त्याची कल्पना नसावी. 'लंचब्रेक'मधे अचानक आलेले 'लॅपटॉप', 'प्रोजेक्टर' पाहून अनेकांना वाटलं, की मराठी भाषेविषयी कोणीतरी पॉवर प्वाइंट प्रेझेंटेशन करणार की काय? मराठीचं हे आधुनिक रुपडं 'याचि देही' पाहू अशी चर्चा करीत अनेकजण भोजन अर्धवट टाकून आले; पण ही गडबड सुरू असतानाच व्यासपीठामागचा पडदा अचानक बदलला गेला. लगोलग केंद्रीय मंत्री, कुलगुरूंचं आगमनही झालं,



झटपट कार्यक्रम सुरू झाला. 'मीडियम ऑफ लँग्वेज' होतं अर्थातच इंग्रजी. मराठीचं 'हाय-फाय' स्वरूप 'वाय-फाय'शी 'कनेक्ट' झालं.

*** 'नवे आत्मभान चुकीचे आणि मतांसाठीच'**

मते मिळविण्यासाठी समाजाची जातीनिहाय, वर्गनिहाय विभागणी करून त्या-त्या जनतेला चुकीचे आत्मभान दिले जात आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी व्यक्त केले.

''प्रजासत्ताक पद्धतीला ५५ वर्षे पूर्ण होत असतानाच त्याचे वासे मोजण्यास सुरवात झाली आहे. ही परिस्थिती भीषण आहे. मात्र, ती लोकांना कळू नये यासाठी शेकडो दूरचित्रवाणी वाहिन्यांचा मारा केला जात आहे. त्यातही निवडीचे स्वातंत्र्य कमीच आहे; कारण सर्व वाहिन्या एकसारख्याच आहेत. देशातील राजकीय पक्षांचीही हीच स्थिती असून, ते थोड्या-फार फरकाने एकच वर्तणूक करीत आहेत,'' असे त्यांनी नमूद केले.

*** संदीप खरे यांच्या कवितेमुळे चॅप्लिनची आठवण**

संदीप खरे यांची कविता ''चार्ली चॅप्लिनची आठवण यावी, अशी मिस्कील, हसत ठेवणारी आहे. या कवितेने आल्हाददायक अनुभव दिला,'' असे ज्येष्ठ कवी शंकर वैद्य यांनी सांगितले.

कॉन्टिनेंटल प्रकाशनातर्फे खरे यांचा 'मौनाची भाषांतरे' हा काव्यसंग्रह अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

श्री. वैद्य म्हणाले,''संवेदनशील भावसंपन्न मन या कवितेत भेटते. चाकोरीबाहेरचे विचार व कलाटणी देण्याची हातोटी यामुळे ही कविता भावते. वृत्त - लयीचे चांगले भान असलेली अशी ही कविता आहे.''

'लव्हलेटर', 'पाऊस' या श्री. खरे यांच्या कविता सादर करून पाटेकर म्हणाले, ''कवीच्या संवेदनेशी आपल्या संवेदना जुळतात, तेव्हाच ती कविता आवडू लागते. आरती प्रभू यांची कविता मला भावायची. प्रत्येक वेळी नवा अर्थ ती हातात ठेवायची. कुसुमाग्रजांचा सूर तसा मला भावतो.''

*** फुले यांचे शेती विकासाविषयीचे विचार आजही महत्त्वाचे**

''स्वातंत्र्यपूर्व काळात देशाच्या शेती विकासाविषयी महात्मा जोतिबा फुले यांनी मांडलेले विचार व त्यासाठी केलेले योगदान आजही महत्त्वाचे आहे,'' असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने उभारलेल्या महात्मा जोतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण त्यांनी केले. सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ, खासदार रामदास आठवले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले,''कृषी विद्यापीठाला महात्मा फुले यांचे नाव देण्याचा मुद्दा उपस्थित झाला, त्या वेळी काहींनी त्यांचा संबंध काय, असा प्रश्न विचारला; परंतु हे लोक फुले यांच्या कृषीविषयक विचारांविषयी अज्ञानी आहेत. मानसिक विकृतीतून विरोध दर्शविणारी ही प्रवृत्ती विकृती म्हणावी लागेल. फुले यांचा जीवनपट समजून

घ्या. कोणीही अन्नावाचून भुकेला नको. उत्पादन वाढले पाहिजे. त्यासाठी संकरित वाण वापरावे, अशी त्यांची भूमिका होती. शेतकऱ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी सत्तेचा वापर व्हावा, असे आज आपल्याला वाटते, हेच विचार फुले यांनी १८७७ मध्ये मांडले. या दृष्टिकोनातून द्रष्टे नेते व महान देशसेवक म्हणून फुले यांचा उल्लेख करावा लागेल.''

श्री. पवार पुढे म्हणाले, ''आधुनिक विज्ञानाला सामोरे जाण्याची दृष्टी आणि उपेक्षितांची कणव फुले यांना होती. उद्योगधंदा, व्यवसाय यांचा आदर्श त्यांनी मांडला. फुले-शाहू-आंबेडकर यांचे विचार देशाला परिवर्तनाची दिशा देऊ शकतात. याच मार्गाने देशातील अनेक राज्यांची वाटचाल सुरू आहे. याविषयी महाराष्ट्रवासीयांना अभिमान आहे.''

### * 'ज्योतिषाच्या डायरीतून' पुस्तकाचे प्रकाशन

पं. अरविंद गजेंद्रगडकर यांनी लिहिलेल्या 'ज्योतिषाच्या डायरीतून' या पुस्तकाचे चित्रकार रवी परांजपे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. उन्मेष प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. डॉ. राजीव शारंगपाणी, डॉ. धुंडिराज पाठक आदी या वेळी उपस्थित होते. ''ज्योतिषातही निरीक्षण आणि आडाखे ठेवायला लागतात. त्यामुळे हे शास्त्र आहे. आणि ते कोण सांगते आहे, यालाही महत्त्व असल्याने त्या दृष्टीने ती कलाही आहे,'' असे मत श्री. परांजपे यांनी व्यक्त केले. उन्मेष प्रकाशनाच्या मेधा राजहंस यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

### * देशाच्या सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्रातच

'विसाव्या शतकातच नव्हे, तर बाराव्या शतकापासून महाराष्ट्रातील साहित्याने देशाच्या सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व केले आहे,' असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केले.

'भारतीय भाषांतील दलित साहित्य' यावरील चर्चासत्राचा समारोप त्यांनी केला.

मराठी साहित्याच्या एकूण चळवळीचा परामर्श घेताना डॉ. कोत्तापल्ले यांनी बाराव्या शतकात संत नामदेवांनी पंजाबमध्ये जाऊन केलेला साहित्यप्रसार, महानुभाव पंथातील साहित्यिकांनी थेट बलुचिस्तानात उभारलेल्या मठांचा व त्यांनी प्रसारित केलेल्या साहित्याचा आढावा घेतला. महाराष्ट्रातील प्रत्येक जातीत निर्माण झालेला संत हा त्या त्या काळातील साहित्याचा हुंकार होता. येथे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, संत चोखामेळा, सोयराबाइ निर्माण झाले. दक्षिणेतही बसवेश्वरांनी आपले साहित्य निर्माण केले, असे ते म्हणाले. बाराव्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंतचा कालखंड मुस्लिम आक्रमकांचा होता. या सहाशे वर्षांच्या कालखंडात जी समाज परिस्थिती निर्माण झाली, त्यातून साहित्य निर्माण झाले, असे त्यांनी सांगितले.

१९६०च्या दशकात महाराष्ट्र जमिनी व तत्संबंधी जे कायदे निर्माण झाले, जमिनीची वाटपव्यवस्था निर्माण झाली त्यातूनच एकूण समाजवादी व्यवस्था निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्र दलित साहित्याची चळवळ बहरली. महाराष्ट्रातले पहिले दलित साहित्य चर्चासत्र औरंगाबादला झाले.

महाराष्ट्र दलितांच्या जमिनीसाठी भूमिहीनांची चळवळ दादासाहेब गायकवाडांनी केली. विविधी चळवळींची पार्श्वभूमी महाराष्ट्राला लाभल्यामुळे महाराष्ट्रातील दलित साहित्याची चळवळ पुढे देशभर पसरली. म. फुले, छत्रपती शाहू, डॉ. आंबेडकर यांची पार्श्वभूमी महाराष्ट्राला असल्यामुळे दलित चळवळींचा हुंकार हा प्रथम महाराष्ट्रातून झाल्याचे त्यांनी नमूद केले. या सत्रात डॉ. अशोक थोरात, डॉ. ज्योती लांजेवार, डॉ. दत्ता भगत व श्री. लक्ष्मण गायकवाड यांनी भाग घेतला.


'दलित साहित्याची समीक्षा' या विषयावर बोलताना डॉ. रा. ग. जाधव यांनी २१ व्या शतकाला सामोरे जाताना प्रत्येक साहित्यिकाने चाणाक्ष, दक्ष, जिज्ञासू व सर्जनशील मनाने साहित्याची चिकित्सा करावी, असा सल्ला दिला. दलित दलितेतर अशी साहित्याची समीक्षा करता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. १९६०-७०चे दशक हे महाराष्ट्रातील चळवळींचे दशक होते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, 'युक्रांद'ची चळवळ, शिवसेनेची स्थापना या सर्व गोष्टींचा मागोवा घेत महाराष्ट्रातील एकूण साहित्याची समीक्षा करणे, त्याचा जीवनवादी दृष्टिकोनातून परामर्श घेणे आवश्यक असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

### * चिपळूणला कोकण बालकुमार संमेलन

चिपळूण येथे कोकण बालकुमारसाहित्य संमेलन १९-२० फेब्रुवारी रोजी साजरे झाले त्याचे अध्यक्ष द. मा. मिरासदार म्हणाले, ''बालसाहित्य मुलांची मने घडवते; मानवी मनाचा शोध घेते. संस्कारक्षम साहित्याची निर्मिती होणे गरजेचे आहे.'' संमेलनाचे उद्घाटन पानिपतकार विश्वास पाटील यांनी केले. पाठ्यपुस्तकातील लेखक कार्यक्रमात मधु मंगेश कर्णिक, शंकर सारडा, लक्ष्मीकांत तांबोळी, निरंजन घाटे प्रभृतींचा सहभाग होता. अनंत भावे, ज्ञानदा नाईक, दत्ता टोळ, मदन हजेरी यांनी कथाकथन व काव्यवाचन केले. स्वागताध्यक्ष नगराध्यक्ष उषाताई लवेकर आणि कार्याध्यक्ष सागरचे संपादक निशिकांत जोशी हे होते. २२०० मुलांनी प्रत्येकी ७५/-रु. शुल्क देऊन या संमेलनाचा आनंद लुटला. प्रकाश देशपांडे, अरुण इंगवले, मिलिंद गोखले वगैरे कार्यकर्त्यांनी जिद्दीने हे संमेलन घेऊन यशस्वी केले. पत्रकार सुहास बारटक्के यांच्या किशोरकथा पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी झाले. ते दिलीपराज प्रकाशनने काढले आहे.

### * उदासीन शिक्षक हा समाजाला शाप

समाजाबद्दल जो शिक्षक उदासीन आहे, तो समाजाला शापच आहे, असे मत आठवणीचा मोहर या पुस्तकाचे लेखक निवृत्त न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे यांनी केले. पद्मभूषण देवचंदजी शाह यांच्या चौदाव्या स्मृतिदिनानिमित्त अर्जुननगर निपाणी येथे आयोजित कार्यक्रमात न्या. गवांदे म्हणाले, ''देवचंदजी शाह यांनी सीमाभागातील उजाड माळरानावर विद्येचे तीर्थस्थान निर्माण केले. बालक, पालक व शिक्षक हा विद्येच्या क्षेत्रातील समभुज त्रिकोण आहे. या तीनही घटकांनी आपली भूमिका जबाबदारीने निभावली पाहिजे.'' अध्यक्षस्थानी जनता शिक्षण मंडळाचे किरण शाह होते. डॉ. अच्युत माने, उपप्राचार्य प्रकाश शाह, सौ. प्रतिभा शाह, आशिष शाह प्रभृती या प्रसंगी उपस्थित होते. ❐




# पुस्तक परिचय

## दक्षिणायन : केप हॉर्न ते कॅरिबियन

**डॉ. रणजित मिरजे**

### मराठी प्रवासवर्णनांमध्ये मानाचा तुरा ठरणारे 'दक्षिणायन'

कोल्हापूरचे डॉ. रणजित मिरजे आणि सौ. शैला मिरजे यांनी चारपाच वर्षांपूर्वी अर्जेंटिना, चिली, दक्षिण ब्राझील, व्हेनेझुएला, पेरू, बोलिव्हिया या दक्षिण अमेरिकेतील देशांचा सहा आठवड्यांचा दौरा केला. या दौऱ्यातील अनुभवांवर आधारलेले 'दक्षिणायन' हे त्यांचे प्रवासवर्णनात्मक पुस्तक मराठीतील सर्वोत्तम प्रवासवर्णनांमध्ये एक अभिजात कलाकृती म्हणून मान्यता पावल्याशिवाय राहणार नाही.

आपल्याकडे अनेक मान्यवर लेखकांनी लिहिलेली प्रवासवर्णने उपलब्ध आहेत; परंतु मूलत: लेखन हा व्यवसाय नसलेल्या डॉ. रणजित मिरजे यांनी आपल्या या प्रवासवर्णनात जे चमकदार रंग भरले आहेत तसे ते भरणे क्वचितच कोणाला जमले असे! आठ दिवस प्रवास करून शेदीडशे पानांचे प्रवासवर्णन लिहिणारे लोक उपलब्ध टूरिस्ट गाइडचा भरपूर उपयोग करतात; आणि खऱ्याखुऱ्या प्रवासवर्णनापेक्षा माहितीचे संकलन पेश करण्यात समाधान मानतात. 'दक्षिणायन' हे पुस्तक माहितीसाठी माहिती देणारे नाही; तर एकूणच प्रवासात आपल्याबरोबर रसिक वाचकमित्रांनाही बरोबरीच्या नात्याने सामील करून घेणारे आहे. डॉ. मिरजे यांनी तीनदा पुनर्लेखन करून या प्रवासवर्णनाचे लालित्य उत्तम प्रकारे परिवर्धित केले आहे. एखाद्या नवागताने पहिल्याच पुस्तकात आपल्या अनुभवांना असे तरल पारदर्शी रूप देण्याची क्षमता दाखवावी ही खरोखरच चकित करणारी सिद्धी आहे.

डॉ. मिरजे हे प्लॅस्टिक सर्जन आहेत. आपल्या प्रवासावर एक लेख त्यांनी लिहून प्रा. कमलाकर दीक्षित यांना दाखवला. 'प्रवासवर्णन हे प्रामुख्याने ललित लेखन असल्याने त्याची भाषा ललित असायला हवी' असे सांगून काही उत्तम प्रवासवर्णने वाचण्याचा सल्ला दिला. ती पुस्तके वाचल्यावर भाषेचे ललित स्वरूपही आपल्याला जमू शकेल असा विश्वास डॉ. मिरजे यांना वाटू लागला. आणि पाचशे



पृष्ठांचे बाड लिहून तयार झाले.

त्यावर प्रा. दीक्षितांचा अभिप्राय पडला. "लेखनात सुधारणा आहे. पण अजून लालित्य आले पाहिजे. बोलीभाषेचा वापर वाढला पाहिजे." तेव्हा पुनश्च पुनर्लेखन करणे आलेच. यात अधिक लालित्य आहे असे लेखकाला स्वत:लाही जाणवलेच.

"आता फक्त पॉलिशिंग राहिलंय. ते तेवढं पुढच्या मसुद्यात करा." प्रा. दीक्षितांचा सल्ला. "तिसरा मसुदा म्हणजे फार नाही. हेमिंग्वे सहा मसुदे करीत असे."

तेव्हा तिसऱ्यांदा मसुदा करणे आले. तो मसुदा प्राध्यापकांच्या पसंतीला उतरला.

उत्तम प्रवासवर्णनाची आणखी काही लक्षणे लेखकाला गवसली.

-प्रेक्षणीय स्थळांच्या बरोबरच आलेल्या अनुभवांवर भर देणे.

-भाषेच्या अडचणीला वळसा देत गुंफलेल्या संवादाच्या गमती जशाच्या तशा उतरवणे.

-तेथील खाद्यजीवनाची गोडी वाचकांना चाखायला लावणे.

-भिन्न स्वभावाच्या व्यक्तिरेखा चितारणे.

-अमेरिका, यूरोप यांच्या आधीच्या प्रवासातल्या आठवणींचे स्मरण देणे.

हे सर्व रसायन उत्तम प्रकारे 'दक्षिणायन' मध्ये एकजीव झाले आहे. त्यामुळे मराठीतले एक अभिजात प्रवासवर्णन म्हणून 'दक्षिणायन' चोखंदळ वाचकांची दाद मिळवल्याशिवाय राहणार नाही अशी मला खात्री वाटते.

> **मराठीतले एक अभिजात प्रवासवर्णन म्हणून 'दक्षिणायन चोखंदळ वाचकांची दाद मिळवल्याशिवाय राहणार नाही अशी मला खात्री वाटते.'**

डॉ. मिरजे यांच्या हातावरची प्रवासरेषा भरभक्कम आहे. १९७५ साली प्लॅस्टिक सर्जरीच्या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेचा दौरा, त्याचवेळी कॅनडा व उत्तर अमेरिकेचा कारने फेरफटका, इंग्लंड ते ग्रीसपर्यंतचा फियाट १२७मधून केलेला प्रवास, भारत आणि पूर्व आशियाची भ्रमंती...तेव्हा नव्या सहस्त्रकाच्या आरंभीच दक्षिण अमेरिकेचा दौरा उरकण्याची प्रेरणा प्रबळ झाली. एखाद्या ट्रॅव्हल कंपनीच्या आखीवरेखीव पॅकेज टूरमध्ये जाणे सर्वात सोपे. अठरा दिवसात बारा शहरे. खर्च पावणेतीन लाख रुपये. सर्व विमान प्रवास. पण स्वत: दौरा केला तर दोन लाखाच्या आत खर्च येत होता. शिवाय खरीखुरी जनसंपर्क संधी. त्यामुळे स्वत:च दौऱ्याची आखणी करणे क्रमप्राप्त. एकूण वीसेक हजार किलोमीटचा प्रवास. त्यातील निम्या तरी मोटरकारने होणार...वगैरे तपशील ठरवत व्हिसा मिळवण्याचे प्रयत्न. त्यात नाना अडसर... विमान तिकिटांचे रिझर्वेशन...आंतरराष्ट्रीय ड्रायव्हिंग लायसन्स...क्रेडिट कार्ड...प्रवासी चेक...आणि शेवटी जोहान्सबर्गच्या

विमानतळावर चार तास काढून ब्युनाजआयर्सच्या विमानतळावर पदक्षेप...झाला दक्षिण अमेरिकेचा फेरफटका सुरू...

प्रवासाबाबत काही पथ्ये आरंभापासून पाळण्याचा कृतनिश्चय.

विमानतळावरून गावात जाण्याआधी पर्यटन केंद्राला भेट देऊन प्रेक्षणीय स्थळांची माहिती मिळवणे, बजेटमध्ये बसणारे हॉटेल बुक करणे, टॅक्सीऐवजी बस वा अन्य वाहनाने जाऊन शक्य तेवढे डॉलर्स वाचवणे, इ.

''पोळ्यातून उठलेल्या मधमाशांप्रमाणे घोंघावणाऱ्या टॅक्सीवाल्यांच्या गराड्यातून वाट काढत पर्यटन केंद्रापर्यंत पोचलो. तिथल्या दोन युवतींपैकी एक युवती दिलखुलास हसत आपले मोरपिसासारखे डोळे फडफडवीत सामोरी आली. तिने सरळ इंग्रजीतच मला अभिवादन केले. पूर्वी कधीतरी आमच्या रंगाच्या लोकांशी तिची गाठभेट झाली असावी...''(२१)

- अशा दिलखुलास शैलीत गप्पा मारल्याचा या सर्व लेखनाचा बाज आहे. त्यात लालित्य हे सहजगत्या आले आहे. प्राध्यापकांनी सुचवले म्हणून ते मुद्दाम आणले आहे असे कृत्रिमपण कुठे जाणवत नाही. लेखक स्वत:वरही विनोद करतो; ''वेळ असता (आणि सौ. बरोबर नसत्या) तर आणखी अघळपघळ बोलत बसायला गंमत आली असती. पण तसले भाग्य असणाऱ्यांच्या राशीचे आम्ही नाही.'' असले कबुलीजबाब वरचेवर येतात.

**''अंगावर बिकिनी वगैरे नव्हती, तरी त्या गुबगुबीत वाळूवर ऊन खात पडलेल्या पाणहत्ती मधे नर कोण आणि मादी कोण हे सांगणे अशक्यच होते. हे बिनकानांचे सील म्हणजे सी एलिफन्ट. कानाच्या सीलना सी लायन म्हणायचे.''**

'विमानतळावरून शहराची आप्तओळख व्हायला सार्वजनिक सेवेतील बससारखे साधन नाही.' यासारखी व्यवहारचतुर निरीक्षणेही या निवेदनात येतात आणि 'पूर्वी गोव्यात दोन्ही टोकांना फुगलेल्या जुन्या बसेस असत. ही सुद्धा त्या काळातीलच असावी.' अशा स्मरणरंजनाची फोडणी निवेदनाच्या खमंगपणात भर टाकते.

'कॉफीची किंमत चार डॉलर! माझा फटफटलेला चेहरा बघून त्या दुकानदारालाही हसू फुटले. भिंतीवरचा दरफलकच त्याने दाखवला. या दराने जर दीडदोन महिने कॉफी घ्यावी लागली तर- चारपाचशे डॉलर्सचा खुर्दा कॉफीवरच उडणार' असा नवऱ्याचा हिशेबीपणा बघून बायको टोमणा मारते, ''काय? प्रवासाचा कालावधी कमी करण्याचा विचार तर नाही ना?'' अशा खेहकर मिस्किल शैलीत हे सगळे प्रवासवर्णन असल्याने ते वाचतच राहावे असे वाटते.

लेखक आपल्याशी कुठलाही आडपडदा न ठेवता बोलतो आहे, जे घडले ते सांगतो आहे; स्वत:च्याही फिरक्या घेतो आहे हे एकूणच संवाद साधायला उपयुक्त ठरते.



भेटलेल्या लोकांशीही लेखक सहजपणे संवाद साधू शकतो; त्यामुळे त्याला तेथील अनपेक्षित आतिथ्याचाही लाभ होतो; आणि दोस्तान्यामुळे प्रवासाच्या खुमारीतही भर पडते.

लेखकाच्या विविध विषयांवर कॉमेन्टस देशोदेशींच्या भ्रमंतीने बहुश्रुत आणि रंजक झालेल्या आहेत. उदा.

''इंग्रजांप्रमाणे हे अर्जेन्टिनीसुद्धा परिसराच्या सुशोभीकरणाबाबत चिंगूस आणि नीरस असावेत.''(२४)

''सकाळी दहानंतर व्यवहार सुरू करणाऱ्या या अर्जेन्टिनींमुळेच इंग्रजीत लॉर्ड फॉकलंड हा शब्द प्रयोग आला असावा.''(२५)

''सोंगाड्यांनी संगीत खुर्चीचा खेळ खेळावा तसे अध्यक्षांना बदलले जाई.''(२७)

''अंगावर बिकिनी वगैरे नव्हती, तरी त्या गुबगुबीत वाळूवर ऊन खात पडलेल्या पाणहत्ती मधे नर कोण आणि मादी कोण हे सांगणे अशक्यच होते. हे बिनकानांचे सील म्हणजे सी एलिफन्ट. कानाच्या सीलना सी लायन म्हणायचे.''(४९)

सौ. ॲनाबाई कॅस्ट्रो शैलाचा ड्रेस चढवून दुपट्टा पदराप्रमाणे डोक्यावर ओढून कपाळावर टिकली लावून महत्प्रयासाने कमरेतून वाकत मला नमस्कार करीत होत्या. उंबरठ्यावरचे तांदळाचे मापटे लवंडून गृहप्रवेश करणाऱ्या एखाद्या नववधूप्रमाणे त्या दिसत होत्या. तासभर तिने शैलाला पीळ पीळ पिळले आणि ड्रेसवर कब्जा केला. (७९)...

**पुर्तो मौंतला जाऊन कुरान्तो न खाणे म्हणजे कोल्हापूरला जाऊन कोल्हापूरी मिसळ न खाता परतण्यासारखे होते. पण भरपेट सुग्रास जेवण म्हणजे झोपेलाही अगत्याचे निमंत्रण...बंद मोटारीला क्रेनने ओढून न्यावे तशी कशीबशी ऑस्तेरियाची चढण चढू लागलो.**

चिलीच्या बाजूला पसरलेली राफेल ही हिमनदी निळ्याभोर पॅसिफिकला भिडत होती. पांढरे बर्फ आणि निळ्या पाण्याने आपल्यामधील लक्ष्मणरेषा कणाकणाने जोपासलेली होती. किंचितही भेसळ होऊ दिली नव्हती. (९४).

पुर्तो मौंतला जाऊन कुरान्तो न खाणे म्हणजे कोल्हापूरला जाऊन कोल्हापूरी मिसळ न खाता परतण्यासारखे होते. पण भरपेट सुग्रास जेवण म्हणजे झोपेलाही अगत्याचे निमंत्रण... बंद मोटारीला क्रेनने ओढून न्यावे, तशी कशीबशी ऑस्तेरियाची चढण चढू लागलो. (१००).

हायवेच्या आधुनिकीकरणासाठी प्रचंड कामे चालू होती. प्रदेश डोंगराळ असूनही सरळ पट्टा तयार होऊ पाहात होता. त्यासाठी काही ठिकाणी केळ सोलावे तशी डोंगराची माती सोलली जात होती तर कधी कैरीचे काप कातावे तसे त्यांची बाजू चिरली जाई. एखादी टेकडी अगदीच आडवी आली तर तिला कलिंगडासारखे मधोमध चिरले तरी जाई किंवा खलबत्त्यात खडीसाखरेची पिठीसाखर करून टाकावी तसा तिचा भुगा करून टाकला जाई. (१०४)

जगभरच्या राजधान्यांची हीच तऱ्हा आहे. स्वत: सुंदर बनतात पण वेशीबाहेरील परिसराचे तीनतेरा वाजवून टाकतात (११६).

राज्याभिषेकाला निघालेल्या महाराजा-महाराणीच्या ऐटीत आमच्या व्हिक्टोरियाचा प्रवास चालू होता. (११६).

ब्राझीलमधला कार्निव्हल...पापविमोचनापूर्वी पापात टाकलेली ही एक प्रकारची भरच... येत्या बुधवारपासून मटण, दारू, समागम, बिडीकाडी वगैरे सर्व ऐहिक आनंदांना महिनाभर सोडचिठ्ठी... अरेच्या! म्हणजे हा तर आपल्या गटारी अमावास्येचाच प्रकार म्हणायचा! (१९४).

असे तुलनात्मक, वर्णनात्मक संदर्भ पानोपानी भेटतात. ते या परक्या देशांतले आणि आपल्यातले अंतर पुसून टाकून दोहोंना एकत्र आणतात.

रिओ दि जानेरो, इदेपू धरण, इग्वासूतले सैतानाचे नरडे हे शिल्प, पाणहत्तींचा कळप, लेक रिजन मधला लॅटिन कैलासपर्वत आणि अप्रतिम पाषाण सौंदर्य, ब्राझीलियातील शिल्पचित्र, ॲमेझॉनमधील निसर्गसौंदर्य, विषुववृत्तीय पर्जन्यवन, ॲमेझान नदी, पेरूमधील माचूपिचू व इंका संस्कृतीचे अवशेष. इयीमतीची बर्फाच्छादित शिखरे--- हे सारे डॉ. मिरजे यांच्या शब्दांतून, शब्दचित्रांतून आपल्यापुढे अवतरतात; त्यांच्याचप्रमाणे आपल्यालाही खुणावतात. 'मानवजातीच्या उत्पत्ती पूर्वीपासूनच्या युगांची झलक त्यातून दिसली. विश्वनिर्मिती बरोबर घडवलेल्या पेमान परिसरातील झऱ्यांचे आणि महाकाय हिमकड्यांनी खरवडून रेताड केलेल्या पातागोनियाचे दर्शन झाले. शीत युगानंतर स्वत:ची उंची वाढवत दोन महासागरांनी निर्माण केलेल्या बीगल जलमार्गाने विहार करण्याचा योग जमून आला. निसर्गाच्या या विविध रूपांबरोबर मानवी स्वभावाचेही अनेक नमुने भेटले; इतिहासातले अनेक टप्पे त्यातून उलगडले.' अशी या फेरफटक्याची अपूर्वाई डॉ. मिरजे सांगतात.

**ब्राझीलमधला कार्निव्हल... पापविमोचनापूर्वी पापात टाकलेली ही एक प्रकारची भरच...येत्या बुधवारपासून मटण, दारू, समागम, बिडीकाडी वगैरे सर्व ऐहिक आनंदांना महिनाभर सोडचिठ्ठी... अरेच्या! म्हणजे हा तर आपल्या गटारी अमावस्येचाच प्रकार म्हणायचा!**

डॉ. रणजित मिरजे यांच्या या पहिल्याच प्रवासवर्णनाने त्यांच्या ललित शैलीचे प्रसन्न दर्शन घडवले आहे. त्यांनी देशोदेशी असेच भटकंती करीत राहावे आणि त्यावर अशीच पुस्तके लिहित राहावे. मराठी माणसाच्या अनुभवाची क्षितिजे विस्तारीत करण्यास प्रेरणा देत राहावे.

**पृष्ठे : ३९२ ● किंमत : २५०रु. ● सभासदांना : २००रु. ● पोस्टेज : २५रु.**




## पाणी
### एक अद्भुत उपचार पद्धती

**ए. आर. हरी**

**अनु. सुभाष जोशी**

**तुम्ही मेलेले पाणी पिता मग आजारी पडणारच!**




अगदी रोजच्या व्यवहारातल्या, चिरपरिचित वस्तू पण तिची माहिती आपल्याला कितीशी असते? असा प्रश्न 'पाणी - एक अद्भुत उपचारपद्धती' हे पुस्तक वाचल्यावर प्रत्येकाला पडेल.

असे वेगळे या पुस्तकात काय आहे?

पाणी - आपण रोज बघतो, पितो, वापरतो. त्यात विशेष ते काय असणार जे आपल्याला ठाऊक नाही?

पृथ्वीच्या पृष्ठभागांपैकी दोन तृतीयांश भाग पाण्याने व्यापलेला आहे. पण त्यामधील फक्त ३ टक्के पाणीच काय ते माणसाने पिण्याच्या योग्यतेचे असते. त्या तीन टक्क्यांपैकी दोन टक्के पाणी हिमनगांच्या रूपात आहे. म्हणजे उरले फक्त एक टक्का पाणी. नद्या, सरोवरे, तलाव, विहिरी, यातून साठवलेले पावसाचे पाणी किंवा भूमिगत जल - हे आपल्याला पिण्यासाठी वापरायला उपलब्ध होते. या पाण्यात अनेक अशुद्ध द्रव्ये आणि सूक्ष्म जिवाणू असतात. पाणी वाळूच्या थरातून गाळून त्यात तरंगणारी अशुद्ध द्रव्ये बाजूला काढली जातात आणि त्यात क्लोरिन मिसळून सूक्ष्म जिवाणूंचा बंदोबस्त केला जातो. असे क्लोरिनमिश्रित पाणी पिण्यासाठी नळांद्वारे शहरांना पुरवले जाते.

पिण्याच्या पाण्यातील जिवाणूंचा बंदोबस्त करण्यासाठी आपण क्लोरिन वापरतो, पण त्या क्लोरिनमुळे रोहिण्या कडक होतात, त्यांचा लवचिकपणा कमी होतो आणि त्यामुळे हृदयविकाराचा किंवा अर्धांगवायूचा झटका येऊ शकतो असे संशोधकांना आढळले आहे. कर्करोगही त्यामुळे संभवतो. पाण्यात विरघळलेला क्लोरिन वायू पाणी खुल्या हवेत ठेवल्यावर उडून जातो, पण उडून जाण्यापूर्वी. तो पाण्यातील

इतर रासायनिक द्रव्यांशी संयोग पावलेला असतो; त्या संयोगातून ऑरगॅनो क्लोरिन्स संयुगे तयार होतात, ती पाण्यातून अलग काढता येत नाहीत.

त्याशिवाय इतरही विषारी रासायनिक द्रव्ये पाण्यात मिसळत असतात. रासायनिक द्रव्यांची निर्मिती करणाऱ्या कंपन्या अनेक टाकाऊ विषारी रसायने नद्या-तलावात सोडून देत असतात. ही विषारी द्रव्ये पाण्यात जाऊ नयेत म्हणून अनेक कायदे केलेले आहेत; पण ही विषारी द्रव्ये अखेर सौम्य करून का होईना पाण्यातच विसर्जित करण्यावाचून गत्यंतर नाही.

भारतातील बहुतेक शहरांना पुरवण्यात येणारे पाणी हे नद्यांमधून घेण्यात येते. त्यात विषारी द्रव्ये, डीडीटी; जंतुनाशके, नायट्रेटस, फॉस्फेटस यांची पातळी धोकादायक पातळीपेक्षा कितीतरी जास्त असल्याचे अनेक पाहण्यांमध्ये दिसून आलेले आहे.

नळांतील पाणी म्हणजे शुद्ध पाणी हा आपला समज किती चुकीचा आहे हे आपल्या लक्षातच येत नाही.

माणसाचे शरीर ७० टक्के पाण्याने बनलेले आहे; मेंदूमध्ये आणि रक्तामध्ये ९०टक्के पाणी असते. योग्य दर्जाचे पाणी योग्य प्रमाणात पिणं हे शरीराचं आरोग्य निरामय आणि चैतन्यमय राखण्याचं रहस्य आहे. पाण्यातील विषारी टाकाऊ द्रव्ये शरीरात साठून राहिली की वेगवेगळ्या व्याधी होतात.

**वृद्धत्वाचे तसेच आरोग्याचे रहस्य पाण्यात दडलेले आहे असे अनेक शास्त्रज्ञ मानतात. त्यावर त्यांचे संशोधन चालू आहे. जीवन निरोगी राखण्यातील पाण्याची भूमिका यावर जर्मनीत व जपानमध्ये त्यावर संशोधन चालू आहे.**

वृद्धत्व येण्यामागेही पाण्याची भूमिका महत्त्वाची ठरते.

वृद्धत्वाचे तसेच आरोग्याचे रहस्य पाण्यात दडलेले आहे असे अनेक शास्त्रज्ञ मानतात. त्यावर त्यांचे संशोधन चालू आहे. जीवन निरोगी राखण्यातील पाण्याची भूमिका यावर जर्मनीत व जपानमध्ये त्यावर संशोधन चालू आहे.

मूळ इराणमधील पण लंडनमध्ये शिकलेले व सध्या अमेरिकेत स्थायिक झालेले डॉ. फेरेदूर बातमघेलिज यांनी सर्व प्रकारच्या जुनाट व्याधींवर पाण्याद्वारे उपचार करण्याची पद्धत विकसित केली आहे आणि हजारो रुग्णांना बरे केले आहे. 'युवर बॉडीज् : मेनी क्राइज् फॉर वॉटर' हे त्यांचे पुस्तक या क्षेत्रात मूलभूत दृष्टी देणारे मानले जाते. शुद्ध पाणी पिण्याचे फायदे याबाबत प्रबोधन करणे हेच त्यांनी आपले जीवनध्येय मानले आहे. मानवी शरीरात होणारे बिघाड हे त्याच्या शरीरातील पाणी कमी पडल्याने होतात; शरीराला पाण्याचा योग्य प्रकारे पुरवठा होत राहिला तर हे रोग होणारच नाहीत; आणि झाले तर बरे होऊ शकतात. तहानेची जाणीव ही मूलभूत जाणीव आहे. तहान लागल्यावर योग्य



तेवढे पाणी पिणे म्हणजे व्याधीचं प्रमाण रोखून धरणं होय; असे ते मनतात.

एक महत्त्वाचे निरीक्षण ते नोंदवतात. नवजात बाळ रडते तेव्हा आई त्याला भूक लागलीय असे समजून दूध पाजते. पहिल्या वर्षात त्याला द्रवरूप अन्न दिले जाते. त्यामुळे त्याची पाण्याची गरज भागते. पण पुढे घन आहार सुरू होतो तेव्हा त्यांचे पचन होण्यासाठी अधिक पाण्याची गरज असते. तेव्हा तहानेने मुले रडतात; पण आई त्याला साध्या पाण्याऐवजी अन्नच देते. किंवा पाणीही साखर घालून देते. ग्राइप वॉटर इ. देते. खरे तर त्याला साधे पाणी हवे असते. पाण्याची जागा दूध, फळांचा रस किंवा ग्राइप वॉटर घेऊ शकत नाही.'

परंतु शुद्ध पाणी न देता गोड द्रवपदार्थ दिल्याने, हळू हळू त्याला तहान लागेनाशी होते. पाण्याशिवाय चालवून घेण्याचीच सवय त्याला लागते. साहजिकच शरीराला आवश्यक तेवढ्या प्रमाणात पाणी पुरवले जात नाही. त्यामुळे काही महत्त्वाच्या इंद्रियांना पुरेशा पाण्याशिवाय राहावे लागते. त्यांची कार्यक्षमता कमी होते. मेंदूलाही त्यामुळे पाण्याचे दुष्काळी नियोजन करावे लागते. स्नायू आणि सांधे यांना योग्य प्रमाणात पाणी न मिळाल्यामुळे त्यांच्या तक्रारी सुरू होतात. चहा, कॉफी, फळांचे रस, बीअर. यामुळे पाण्याची उणीव भरून निघत नाही; उलट तहानेची भावना मारली जाते. असे वर्षानुवर्षे चालते. त्यामुळे एकेक अवयव निकामी होऊ लागतो.

**चहा, कॉफी, फळांचे रस, बीअर. यामुळे पाण्याची उणीव भरून निघत नाही; उलट तहानेची भावना मारली जाते. असे वर्षानुवर्षे चालते. त्यामुळे एकेक अवयव निकामी होऊ लागतो.**

डॉ. बातमघेलिज यांच्या मते आधुनिक वैद्यकशास्त्र पाण्याकडे एक अक्रियाशील द्रावक म्हणून पाहते, पाण्यात विरघळणारे पदार्थ पोटात गेल्यावर काय होते याचाच विचार हे वैद्यकशास्त्र करते. औषधांनी रोग बरा होत नाही. फक्त नियंत्रणाखाली ठेवला जातो.

शुद्ध पाणी भरपूर पिण्याची सवय असेल तर अनेक व्याधींना वावच उरत नाही. दररोज तीन साडेतीन लिटर म्हणजे दहा ग्लास पाण्याची गरज आपल्या शरीराला आहे. माणसाच्या वजनावर ही गरज ठरते. जेवताना वा जेवल्यावर लगेच पाणी पिऊ नये. त्यामुळे पाचकरस सौम्य होऊन शरीराला अपाय होतो. पचनक्रिया मंद होते. पोटात विषारी द्रव्ये साठतात. अन्न कुजून त्याचे वायूत रूपांतर होते. अस्वस्थ वाटू लागते. या अवस्थेत शरीरातील पेशींमधील पाणी कमी झालेले असल्याने पचनक्रियेत त्या परिणामकारकरीत्या भाग घेऊ शकत नाहीत.

साधारणपणे पाणी पिण्याचे वेळापत्रक कसे असावे? -

* सकाळी उठल्यावर एक ग्लास पाणी प्यावे.
* नाश्ता करण्याआधी अर्धा तास - एक ग्लास
* दुपारी जेवणापूर्वी एक तास - एक ग्लास
* जेवणानंतर अडीच तासांनी - एक ग्लास
* दुपारी गरजेप्रमाणे - एकेक ग्लास
* रात्रीच्या जेवणापूर्वी एक तास - एक ग्लास
* रात्रीच्या जेवणानंतर अडीच तास - एक ग्लास
* मूत्रपिंडाचा विकार असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने जास्त पाणी घ्यावे. जेवढे पाणी पितो तेवढे मूत्ररूपाने बाहेर जाणे आवश्यक.

पाण्याबद्दल किती वेगवेगळ्या प्रकारे विचार केला जातो, याची थोडीशी चुणूक या पुस्तकात बघायला मिळते आणि साधी पाणी पिण्याची कृतीही किती रहस्यमय आहे याची कल्पना येते.

पाणी ही एक जिवंत ऊर्जा आहे असे व्हिक्टर शाऊबर्गरचे मत. नद्या आणि झऱ्यांचे प्रवाह नैसर्गिकरीत्या सावली असलेल्या बंधाऱ्यांतून वाहतात. जणू ते सूर्याच्या प्रखर किरणांपासून आणि उन्हापासून स्वत:चं रक्षण करीत असतात. जीवनशक्ती वाहून नेण्यासाठी पाण्याचं तापमान आजूबाजूच्या तापमानापेक्षा कमी असावं लागतं.

**धरणं, कालवे बांधून मिळणारे पाणी हे मृत पाणी होय. त्यातली जीवनशक्ती क्षीण झालेली असते. बाह्यस्फोट प्रकारातून मिळणारी शक्ती ही केंद्रापासून दूर जाणारी असते. कृत्रिमरीत्या पाण्याला वाहण्यास भाग पाडल्याने त्यातील जीवनशक्ती नाहीशी होते.**

नद्या आणि निर्झर यांच्यातून वाहणारी ऊर्जा माणूस आपल्या कामासाठी निर्वेधपणे वापरू शकतो. या उर्जेचे वर्णन करण्यासाठी तो 'अंत:स्फोट' हा शब्द वापरतो. पाण्यात भोवरे निर्माण होतात. पाणी गोल गोल फिरते. याचा अर्थ त्यात मोठ्या प्रमाणावर ऊर्जा एकत्रित झालेली असते. वेड्यावाकड्या वळणांतून पुढं जाताना पाण्यातील ऊर्जा दुसऱ्यांना दिली जाते व घटते. भोवऱ्याद्वारे ती ऊर्जा पाणी पुन्हा मिळवते. पाण्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेचा स्रोत कधीही न आटणारा आहे, हे लक्षात घेऊन व्हिक्टरने अनेक ऊर्जा उपकरणांचा शोध लावून त्यांची पेटंटस घेतली. डोंगरातल्या झऱ्याचं पाणी हे जिवंत पाणी असतं, ते सजीवांना उत्तम आरोग्य- चैतन्य देते.

याच्या उलट धरणं, कालवे बांधून मिळणारे पाणी हे मृत पाणी होय. त्यातली जीवनशक्ती क्षीण झालेली असते. बाह्यस्फोट प्रकारातून मिळणारी शक्ती ही केंद्रापासून दूर जाणारी असते. कृत्रिमरीत्या पाण्याला वाहण्यास भाग पाडल्याने त्यातील



जीवनशक्ती नाहीशी होते असे प्रतिपादन करणारा व्हिक्टर शाऊबर्गर (१८८५-१९५८) हा पहिलाच शास्त्रज्ञ होय. आजची आपली पाण्याची गरज ही बाह्यस्फोटातून भागवली जाते; त्या प्रयत्नात ७० टक्के ऊर्जा वाया जातो. शहराला होणारा पाणीपुरवठा हा दूर अंतरावर असणाऱ्या तलावातून होतो. हे पाणी शहरापर्यंत आणण्यासाठी उच्च दाबाचे टर्बाईन पंप वापरले जातात. या अनैसर्गिक गतीमुळे पाण्यातील जीवनशक्ती नाहीशी होते म्हणून नळातून येणाऱ्या पाण्याला तो मेलेले पाणी, जीवनशक्ती नसलेले पाणी असा शब्द वापरतो. हे पाणी शरीराच्या अंतर्गत क्रियांमध्ये पूर्ण क्षमतेने भाग घेऊ शकत नाही, नेमलेले काम नीट करू शकत नाही; ते काम करण्यासाठी हे पाणी शरीरामधीलच ऊर्जा वापरते. माणूस जे पाणी पितो त्याची जीवनशक्ती त्या माणसाच्या जीवनशक्तीपेक्षा जास्त असायला हवी. येथे नेमकी उलट स्थिती असते. हे पाणी शरीराला ऊर्जा देण्याऐवजी शरीरातील ऊर्जाच स्वत:साठी वापरते.

नळाने पुरवलेले पाणी हे उर्जेच्या दृष्टीने मृत झालेले, ऊर्जा नष्ट झालेले पाणी असते. ते पाणी पोटात जाऊनही अवयवांपर्यंत पोचत नाही. शरीरात शोषलं जात नाही. त्यामुळे पोटात गुरगुर होते. जेवणानंतर सुस्ती येते.

**मृत पाण्याच्या वापराने मानवाच्या जीवनऊर्जेची कार्यक्षमता कमी होत आहे. पाण्यातील ऊर्जा रासायनिक विषारी द्रव्यांमुळे चैतन्यहीन बनून शरीराला व्याधींनी पोखरून टाकत आहे.**

बाह्यस्फोटापासून ऊर्जा मिळवण्याचा मार्ग हा माणसाला सर्वनाशाकडे नेणारा आहे असे व्हिक्टरचे मन होते. पण त्याच्या या मताकडे कोणी लक्ष दिले नाही. त्याच्या आधीच बाह्यस्फोट पद्धतीने चालणाऱ्या इंजिनांची निर्मिती सर्व क्षेत्रात होऊ लागली. मोटारींची इंजिने बाह्यस्फोटाच्या ऊर्जेवर धावू लागली. व्हिक्टरच्या मताला मान दिला असता तर या सर्व कारखान्यांना दिवाळे काढावे लागले असते.

मृत पाण्याच्या वापराने मानवाच्या जीवनऊर्जेची कार्यक्षमता कमी होत आहे. पाण्यातील ऊर्जा रासायनिक विषारी द्रव्यांमुळे चैतन्यहीन बनून शरीराला व्याधींनी पोखरून टाकत आहे.

नळाच्या पाण्यातील बायो-फोटॉन्सचा अभाव व्हिडिओशूटिंगद्वारे संशोधकांनी तपासून पाहिला आहे. पाणी भोवऱ्याच्या गतीने जाऊ दिले तर बायो-फोटॉन्स त्यात पुन्हा आढळतात. बायोफोटोन्स असणे म्हणजे जीवनशक्ती असणे. त्या पाण्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते, तरतरी वाटते; उत्साह वाटतो.

पाणी हे आपल्याला तहान लागेल तेव्हाच प्यायला हवे असे नाही. दिवसभर ते थोडेथोडे पीत राहणे हे फायदेशीर ठरते. निर्जलीकरणामुळे त्वचा शुष्क होते, डोके दुखते, थकवा येतो. रक्तदाब वाढतो. पचनसंस्था- मूत्रपिंड यांचे कार्य मंदावते असे कॉर्नेल युनिव्हर्सिटीतील संशोधनातून निष्कर्ष निघाले आहेत. (पृष्ठ ४४) मूत्राशयाची पिशवी दिवसातून सहा वेळा तरी मोकळी व्हावी असे आयुर्वेदातही सांगितले आहे. याचा अर्थ दर दोन तासांनी बाथरूमला भेट द्यायला हवी.

पुरेसे पाणी पिऊन शरीराची पाण्याची गरज योग्य प्रकारे भागवली तर अनेक आजार आटोक्यात येतात.

'पाण्याचा संदेश' (मेसेज फ्रॉम वॉटर) हे जपानी संशोधक मसारू इमोटो यांचे पुस्तकही खूप गाजलेले आहे. पाणी हे मानवी कंपनांना, विचार-कल्पनांना, शब्दांना, संगीताला माणसासारखा प्रतिसाद देते असे त्यांचे निरीक्षण आहे. डोंगरातल्या झऱ्याचं पाणी प्यायल्यावर आपल्याला उत्साह वाटतो. कारण ते उर्जेच्या उच्च पातळीवर असते. पाण्याकडे प्रेमाने बघायला हवे. कारण पाण्यामुळेच आपण जिवंत असतो.

**कॉफी, चहा, सोडा, शीतपेये, बीअर, वाईन, अल्कोहोलयुक्त पेये प्यायल्यामुळे शरीराचे निर्जलीकरण होते; त्यामुळे लघवीचे अतिरिक्त उत्पादन शरीरात होते आणि शरीरातील द्रव पदार्थ बाहेर टाकले जातात. ही पेये दीर्घकाळ घेत राहिल्याने शरीरात निर्जलीकरणाची क्रिया होऊन तब्येत बिघडते.**

जे सजीवांना उपयुक्त ठरेल, घातक ठरणार नाही ते पाणी म्हणजे जिवंत पाणी. त्याची चार वैशिष्ट्ये नॉर्डिक लिव्हिंग वॉटर सिस्टिम्सचे मायकेल लुंड यांनी दिली आहेत.

१. जिवंत पाण्याच्या थेंबाभोवती एकजिनसी वर्तुळाकार पटल असणे.

२. मृत पाण्याच्या थेंबाभोवतीचं पटलं वेडंवाकडं असतं.

३. जिवंत पाण्यात जाळीसारखी रचना दिसून येते.

जिवंत पाण्याचा थेंब वाळून गेल्यावर ही रचना अधिक स्पष्ट दिसते.

४. मृत पाण्याचा थेंब वाळल्यावर फक्त कचऱ्याचे कण दिसतात.

आधी गाळून शुद्ध केलेल्या पाण्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी रिव्हायटलायझर हे उपकरण वापरतात.

उर्जित पाणी पिण्याचे फायदे पुढीलप्रमाणे.

१. जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचे अधिक शोषण

२. टाकाऊ व विषारी पदार्थांचे कार्यक्षम पद्धतीने उत्सर्जन

३. पाण्यातील मोकळ्या फ्री रॅडिकल कणांचं उच्चाटन करण्यासाठी अँटि-



ऑक्सिडंट म्हणून काम करणे.

कॉफी, चहा, सोडा, शीतपेये, बीअर, वाईन, अल्कोहोलयुक्त पेये प्यायल्यामुळे शरीराचे निर्जलीकरण होते; त्यामुळे लघवीचे अतिरिक्त उत्पादन शरीरात होते आणि शरीरातील द्रव पदार्थ बाहेर टाकले जातात. ही पेये दीर्घकाळ घेत राहिल्याने शरीरात निर्जलीकरणाची क्रिया होऊन तब्येत बिघडते. (४४).

पाण्यावर चुंबकीय प्रक्रिया करून ते उपचारासाठी वापरणे. श्रेयस्कर ठरते. त्यामुळे पाण्याची चव सुधारते, आरोग्य सुधारते, आम्लपित्त कमी होते, जखमा लौकर भरून येतात, पचन क्रिया सुधारते, टाकाऊ पदार्थ शरीराबाहेर सहजपणे टाकले जातात, जुनाट व्याधींचा बंदोबस्त होतो; रोहिण्यांमध्ये कॅल्शियमचे साठे साचून राहण्याची प्रक्रिया क्षीण होते.

अधिक ऊर्जा व जीवनशक्ती असणारे पाणी बनवण्यासाठी द बीमर, नॉर्डिक वॉटर रिव्हायटलायझर, एडीआर एनर्जी स्टिम्युलेटर, ग्रँडर लिव्हिंग वॉटर सिस्टिम्स, ॲक्वा व्होर्टेक्स, ऊर्जा मग वगैरे उपकरणे वापरण्यात येतात. वेलनेस फिल्टरनेही चांगल्या दर्जाचे पाणी मिळते. आयोनाइज्ड किंवा अल्कधर्मी पाणी अँटिऑक्सिडंट म्हणून कार्य करणाऱ्या निगेटिव्ह आयन्सच्या निर्मितीला चालना देते. मात्र ९ पेक्षा अधिक पीएच मूल्य असणारे अल्कधर्मी पाणी नेहमी पिणे आरोग्याला पोषक ठरत नाही हेही लक्षात ठेवणे जरूर आहे. (९८)

**निरोगी आणि चैतन्यशाली जीवन जगण्याची आपली आकांक्षा योग्य प्रकारच्या पाण्याच्या प्राशनाने प्रत्यक्षात उतरू शकते. जगभर पाण्याबाबत संशोधन चाललेले आहे आणि पाण्याबाबतही जिवंत व मृत अशा स्थिती संभवतात याची या पुस्तकामुळेच आपल्याला जाणीव होते.**

एकूणच पाणी या गोष्टीकडे आपण गंभीरपणे बघायला हवे हे या पुस्तकामुळे आपल्या मनावर ठसते. निरोगी आणि चैतन्यशाली जीवन जगण्याची आपली आकांक्षा योग्य प्रकारच्या पाण्याच्या प्राशनाने प्रत्यक्षात उतरू शकते. जगभर पाण्याबाबत संशोधन चाललेले आहे आणि पाण्याबाबतही जिवंत व मृत अशा स्थिती संभवतात याची या पुस्तकामुळेच आपल्याला जाणीव होते.

डॉ. ए. आर. हरी यांच्या पुस्तकाचे सुभाष जोशी यांनी केलेले भाषांतर कुठेही क्लिष्ट वाटत नाही. अनेक अवघड संकल्पना सुबोध शब्दांत जोशींनी मराठीत सहजपणे प्रकट केल्या आहेत. पाणी म्हणजे एक सर्वोत्तम औषध आहे आणि औषधोपचाराची प्रणाली आहे हे लक्षात घेतले तर कुटुंबातील आरोग्यविषयक अनेक समस्यांचा मूलतःच निरास होईल.

**पृष्ठे : १०४ ● किंमत : ७०रु. ● सभासदांना : ५५रु. ● पोस्टेज : २०रु.**




# चाइल्ड ऑफ होलोकास्ट

जॅक कूपर

अनुवाद
सिंधू विजय जोशी

## ॲन फ्रँकच्या जातकुळीतला यांकली कुपरब्लम आणि त्याची कहाणी

'डायरी ऑफ ॲने फ्रँक' या पुस्तकाने जगभर सहृदय वाचकांच्या भावनांना हेलावून सोडले. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान हिटलरच्या निर्घृण दहशतवादाचा फटका बसलेल्या एका ज्यू कुटुंबाच्या आत्मसंरक्षणासाठी चाललेल्या प्रयत्नाची ॲने फ्रँक या तेरा वर्षाच्या मुलीच्या डायरीतून उघड झालेली कहाणी अंत:करणाला पीळ पाडणारी होती. ती डायरी काही प्रसिद्धीसाठी लिहिलेली नव्हती; किंवा सराईत लेखिकेने काही हेतू समोर ठेवून लिहिलेली नव्हती. ती एका साध्यासुध्या सामान्य मुलीच्या मनावर त्यावेळच्या परिस्थितीचे जे ओरखडे उमटत होते त्यांची सरळ, आडपडदा न ठेवता वा कोणतीही पोझ न घेता केलेली नोंद होती. पण त्या नोंदींनाच एका सामाजिक दस्तऐवजाचे मोल प्राप्त झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या भीषणतेचे त्या कुमारवयातल्या एका मुलीवर उमटलेले ठसे, भयभीत करणारे वातावरण त्या डायरीद्वारे जे प्रकट झाले तेही त्याची दाहकता सूचित करणारे होते. अंत:करणाला पीळ पाडणारे होते.

त्याच धर्तीवरचे एक ताजे पुस्तक म्हणून 'चाइल्ड ऑफ द होलोकॉस्ट' या पुस्तकाकडे लक्ष वेधावेसे वाटते. जॅक कूपर याचे नाव त्यावर लेखक म्हणून आहे. कॅनडात त्याचे वास्तव्य आहे. सत्तरी ओलांडलेला जॅक कूपर नट, ग्राफिक आर्टिस्ट, ॲनिमेटर म्हणून तेथील टेलिव्हिजनच्या क्षेत्रात नावाजलेला आहे. व्हेनिस चित्रपट महोत्सवात उत्तम दिग्दर्शक म्हणून त्याचा खास गौरव झाला आहे. आणि त्याच्या स्वत:च्या कंपनीद्वारे शैक्षणिक व औद्योगिक वार्तापट बनवण्याचा त्याचा व्यवसायही उत्तम चाललेला आहे. ह्या जॅक कूपरचे बालपण गेले ते यांकली कुपरब्लम या नावाने; पोलंडमधल्या एका छोट्याशा गावात. एका ज्यू कुटुंबातील हा मुलगा जेमतेम आठ वर्षांचा असताना दुसऱ्या महायुद्धाच्या वावटळीत सापडला. जर्मन सैन्याने पोलंडचा ताबा घेऊन तेथील ज्यू कुटुंबांची कत्तल करण्याचे किंवा ज्यू स्त्रीपुरुषांना छळछावण्यांत डांबण्याचे सत्र आरंभले. त्यामुळे अनेक ज्यू भूमिगत झाले, घरदार सोडून परागंदा झाले. काही पालकांनी आपले काही खरे नाही; पण आपली मुले तरी सुरक्षित राहावीत म्हणून त्यांना तेथील अन्य ज्यू नसलेल्या कुटुंबात ठेवण्याचा मार्ग पत्करला; आणि त्या मुलांना आपण ज्यू आहोत हे उघड करण्यास मनाई केली. तरीही कोणी शेजारीपाजारी चुगली करतील, कोणी जर्मनांच्या छळाने त्रस्त होऊन या भागात ज्यू कुठे लपलेले आहेत ते सांगण्यास प्रवृत्त होतील,अशी धास्ती होतीच.

आठ वर्षाच्या याकोबला त्याच्या आईने याच भावनेने कुलीक गावातली आपली मैत्रीण पैझॅकबाई हिच्या हवाली केले आणि त्याच्याकडे लक्ष देण्यास सांगितले. ''मी आहे तुझ्याबरोबर! तुझ्या आईची खात्री आहे. तू माझ्याकडे सुखरूप राहशील'' अशी छोट्या याकोबची पैझॅकबाई समजूत काढतात. यांकुली किंवा किबुश या नावाने त्याला तेथे ठेवून घेतले जाते. पैझॅक बाईच्या शेजारणी ज्यूंना शिव्या देणाऱ्या, ज्यूंना घाणेरडे, हेरींग मासे विके म्हणून नावे ठेवणाऱ्या अशा असतात... ज्यूंची गावातली दुकाने बंद झाल्याने पैझॅकबाईंनी दूध-अंडी-चीज, कपडे-टोप्या-मफलरी,छत्र्या वगैरेंचे छोटे दुकान काढलेले. वॉर्साहून त्या ज्यू व्यापाऱ्यांकडून माल आणून कुलीकमध्ये विकत. ज्यू लोकांना नतद्रष्ट म्हणत. मात्र यांकलीला त्या मायेने वागवत म्हणत, ''अरे यांकू, तुझा काही दोष नाही. तुझ्या पूर्वजांनी येशूला सुळी दिले ना, म्हणून जर्मन त्याचा बदला आता घेत आहेत.''

**एका ज्यू कुटुंबातील हा मुलगा जेमतेम आठ वर्षांचा असताना दुसऱ्या महायुद्धाच्या वावटळीत सापडला. जर्मन सैन्याने पोलंडचा ताबा घेऊन तेथील ज्यू कुटुंबांची कत्तल करण्याचे किंवा ज्यू स्त्रीपुरुषांना छळछावण्यांत डांबण्याचे सत्र आरंभले.**

छोटा यांकली गुरांना चरायला नेई. शेतावर काम करी,

पैझॅकबाईची मुलगी गिनिया ही दुपारचे जेवण घेऊन शेतावर येई. एकदा तिची एका थोराड गुराख्याने छेड काढली तर यांकुलीने त्याला काठीने मारले. त्याने याकुलीची मग चांगली धुलाई केली. रात्री त्याच्या अंगाला तेल लावत गिनिया म्हणाली, ''वयाच्या मानाने खूपच शूरपणा दाखवलास तू!'' पैझॅकबाईंकडे पळून आलेले काही रशियन युद्ध कैदी येतात. लपून राहतात. त्यातल्याच इव्हानचे आणि गिनियाचे मेतकूट जमते... इव्हानचा मित्र साशा, हा यांकुलीचा दोस्त होतो. तोही यांकुलीबरोबर गुरे चरायला नेत असतो. तोही ज्यूच असतो. अनाथालयात राहून मोठा झालेला असतो...

जर्मन लोक घराघरात शिरून ज्यूंचा शोध घेत असतात. तेव्हा यांकुलीला एका खड्ड्यात लपून राहावे लागते. दोन चौरस फुटांचा चौकोनी तो खड्डा. थंडीत बटाटे साठवण्यासाठी केलेला कुलर...

त्याच वेळी साशाला जर्मन सैनिक ठार मारतात... पैझॅक कुटुंबीय त्याचे प्रेत आणून त्याला खड्डा खणून मूठमाती देतात. शवपेटी त्यावेळी कुठे मिळणार?

त्यानंतर यांकुलीचा मामा मोशे त्याला भेटायला येतो. बुटाशिवाय चालल्याने पाय रक्ताळलेले. तो त्याला आईची खबरबात सांगतो. शेतावर कापणीच्या कामात मदत करतो. परंतु शेरीफ बजावतो, ''ज्यूंना शेतावर काम देऊ नका. ज्यूंना जर्मन गेस्टापोच्या ताब्यात द्या.'' तेव्हा पैझॅकबाई या दोघांना तेथून लगेच निघून चेल्म गावी जायला सांगतात. तेथे ज्यूंची मोठी वस्ती असते. ''एक जरी ज्यू शेतावर दिसला तर गाव पेटवून देऊ'' असे गेस्टापो म्हणतात. त्यामुळे पैझॅकबाईंचा नाइलाज होतो.

...मोशे आणि यांकली रात्री एका गवताच्या गंजीत शिरून झोपतात. दोघांनी एकत्र राहणे धोक्याचे असे दिसल्यावर ते मामा-भाचे वेगळे मार्ग चोखाळतात. यांकुली एका घराचे दार ठोठवून काहीतरी खायली मागतो. घरमालक सिबुल्की त्याला घरी ठेवून घेतो. शेतावर काम करायला सांगतो. सिबुल्की त्याला देवाची प्रार्थना करायला सांगतो. तेव्हा आपण धर्मविरोधी काहीतरी केल्याची चुटपुट त्याला लागून राहते. ''देवा मी आज चुकीचं वागलोय रे! गुडघ्यावर बसून हातांचा क्रॉस केला. पण ते नुसतं नाटक होतं. मला क्षमा कर.''

> **सिबुल्की त्याला देवाची प्रार्थना करायला सांगतो. तेव्हा आपण धर्मविरोधी काहीतरी केल्याची चुटपुट त्याला लागून राहते. ''देवा मी आज चुकीचं वागलोय''**

दुसऱ्याच दिवशी त्याला तेथून निघावे लागते. परत पैझॅकबाईंच्या आश्रयाला यावे लागते. गेस्टापोंची गस्त चालू असते. त्याला लपवण्यात येते.

...अशा या भ्रमंतीतून नाना अनुभव घेत यांकुलीचा प्रवास चालू राहतो. वेगवेगळ्या कुटुंबात त्याला आश्रय मिळतो. पण कुठेच फार काळ राहणे सुरक्षिततेचे नसते. त्यामुळे भ्रमंती चालूच राहते. डुकरे पाळणे, कापणे साफ करणे, शेतकाम करणे वगैरे गोष्टी आत्मसात करीत गुजराण करावी लागते.

जर्मनीचा पराभव झाल्यावर रशियन सैन्य पोलंडमध्ये घुसते. ज्यूंना वेगवेगळ्या ठिकाणी शिबिरात ठेवण्यात येते. एका अनाथाश्रमात यांकुलीची व्यवस्था होते.

कॅनेडियन ज्युइश कॉंग्रेस चौदा वर्षे वयाच्या यांकुलीला अनाथाश्रमातून कॅनडाला हलवते. तेथे त्याला शाळेत घालण्यात येते. व्यावसायिक शिक्षण देण्यात येते आणि स्वकर्तृत्वावर जगण्याची संधी देण्यात येते.

होलोकास्टचा बळी स्वतःची नवी ओळख धारण करून जगू लागतो.

ॲने फ्रँकप्रमाणेच हा यांकुलीही आपल्या भावजीवनात स्थान पटकावेल.

**पृष्ठे :१९६ ● किंमत :१३०रु. ● सभासदांना :१०५रु. ● पोस्टेज : २०रु.**



# पुरस्कार

## * हा पुरस्कार माझा नव्हे, माझ्या सर्व सहकाऱ्यांचा - डॉ. केळकर

मेहता पब्लिशिंग हाऊस फाउंडेशनच्या वतीने स्वामीकार रणजित देसाई साहित्य पुरस्कार व कमलाबाई ओगले पुरस्कार देण्यात येतात.

नुकताच २००२ ते २००४ या सालासाठीच्या पुरस्कारांचे वितरण पुण्यात मराठा चेंबर ऑफ कॉमर्स येथे अत्यंत नेटकेपणाने पार पडले. काही कारणाने गेल्या ३ वर्षांचे पुरस्कार समारंभ होऊ न शकल्याने ३ वर्षांचे पुरस्कार या समारंभात दिले गेले.

समाजाला दिशा दाखवणारे लेखन करणाऱ्या लेखकांना कमलाबाई ओगले साहित्य पुरस्कार दिला जातो. तर विविध क्षेत्रांत अनंत अडचणींवर मात करून विधायक कार्य करणाऱ्या व्यक्तींना कमलाबाई ओगले जिद्द पुरस्कार दिले जातात.

दर्जेदार चरित्रात्मक लेखन करणाऱ्या, ज्येष्ठ लेखिका वीणा गवाणकर यांना २००२ सालचा, नवीन विचार मांडणारे वेगळ्या शैलीचे लेखन करणाऱ्या लोकप्रिय लेखिका सानिया यांना २००३ सालचा व जोहडकार सुरेखा शहा यांना २००४




*आनंद यादव यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. संजीवनी केळकर*

सालासाठीचा कमलाबाई ओगले साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. २००२ सालच्या जिद्द पुरस्कारासाठी अत्यंत व्याधीग्रस्त असताना ज्ञानाचा दीप चेतवणारे कै. विवेक दिवेकर यांची २००३ सालासाठी ग्रामीण स्त्रीला सक्षम, शिक्षित व संघटित कणाऱ्या सांगोल्याच्या डॉ. संजीवनी केळकर यांची व २००४ सालासाठी अथक परिश्रमाने विंचू दंशावर संशोधन करणारे डॉ. विवेक बावस्कर यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. अनुराधा ओगले यांनी दीपप्रज्वलन करून केली. ओगले पुरस्कार देण्यामागची भूमिका श्री. अनिल मेहता यांनी प्रास्ताविकात मांडली.

ज्येष्ठ साहित्यिक व फाउंडेशनचे अध्यक्ष आनंद यादव यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

आपले मनोगत व्यक्त करताना वीणा गवाणकर म्हणाल्या, ''मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनने राजहंस प्रकाशनाच्या लेखिकेची निवड पुरस्कारासाठी केली हे मला विशेष महत्वाचे वाटते. तसेच माझ्या पुस्तकांवर वाचकांनी जे प्रेम केलं त्याचा आनंद हा सर्वात मोठा आहे. या पुरस्काराने माझ्या लेखनाला फार मोठी दाद मिळाल्याचे समाधान वाटते.''

'जोहड'कार सुरेखा शहा म्हणाल्या, ''मेहता पब्लिशिंग हाऊस सारख्या अग्रगण्य संस्थेचा आणि कमलाबाई ओगले यांच्या नावाने मिळणारा पुरस्कार हा मला विशेष सन्मानाचा वाटतो.''

जिद्द पुरस्काराचे मानकरी कै. विवेक दिवेकर यांची जीवनकहाणी सायली गोखले यांनी सांगितली. मानेच्या मणक्यात ट्यूमर झाल्याने या असाध्य रोगाने आपण सर्वसाधारण आयुष्य जगू शकणार नाही हे समजल्यावर आपल्या पत्नीला घटस्फोट देऊन तिचे स्वत:च दुसरे लग्न त्यांनी लावून दिले व शरीराची हालचाल करणे अशक्य असताना रेडिओलॉजीचा अभ्यास करून ते वैद्यकीय कॉलेजात स्ट्रेचरवरून शिकवायला जात असत. व आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी अत्यंत व्याधीग्रस्त असूनही ज्ञानदान केले. या त्यांच्या अफाट जिद्दीबद्दल त्यांना मृत्यूनंतर जिद्द पुरस्कार देण्यात आला.

डॉ. संजीवनी केळकर यांनी सांगोल्यासारख्या खेड्यातील प्रत्येक ग्रामीण स्त्रीला सक्षम, शिक्षित व संघटित करण्याचे जणू व्रत स्वीकारले. त्यासाठी प्रथम सहविचार गट स्थापन करून कामाची प्रेरणा दिली. व अनेक कार्यकर्ते निर्माण करून गेल्या २५ वर्षांत मोठे कार्य उभे केले. आपल्या मनोगतात त्या म्हणाल्या, 'मी शहरातून खेड्यात गेले. तेव्हा ज्या गोष्टींसाठी शहरात मला कोणतेच प्रयास पडत नव्हते अशा अगदी साध्या सुविधांसाठीही ग्रामीण स्त्रीला प्रचंड संघर्ष करताना मी पाहिलं. ग्रामीण स्त्री अनेक समस्यांना तोंड देत मोठ्या जिद्दीने कुटुंबाला जगवत असते. तिच्यासाठी आपण काही केले पाहिजे याची मला तीव्रतेने जाणीव झाली. मला माझ्या अनेक सहकाऱ्यांचे सहकार्य लाभले. हा पुरस्कार माझा नव्हे तर माझ्या सर्व सहकाऱ्यांचा आहे.''

डॉ. हिंमतराव बावस्कर म्हणजे कोणत्याही मदतीशिवाय विंचूदंशावर संशोधन करून अनेकांचे प्राण वाचवणारे जणू देवदूतच. अत्यंत खडतर परिस्थितीतून आपले वैद्यकीय शिक्षण बावस्कर यांनी पूर्ण केले. व कोकणात डॉक्टर म्हणून त्यांची नेमणूक झाली. तेव्हा तिथे विंचू दंशाने अनेकजण मृत्यूमुखी पडत. विंचूदंशानं माणूस मरतो असे डॉक्टरीच्या शिक्षणात कधीच शिकवले गेले नव्हते. एका लहान मुलाच्या आईचा विंचूदंशाने झालेला मृत्यू पाहून त्यांनी यावरचे औषध शोधण्याची प्रतिज्ञा केली व ती एकट्याच्या हिंमतीवर पूर्ण केली. व अनेकांचे प्राण वाचवले. त्यांच्या संशोधनाची परदेशात खूप प्रशंसा झाली. डॉ. बावस्कर आपल्या मनोगतात म्हणाले, 'डॉ. दिवेकरांचे चरित्र ऐकल्यावर मी या पुरस्कारासाठी पात्र नाही असे मला वाटते. कारण माझे सर्व अवयव शाबूत आहेत. आणि त्यांचा मी थोडाफारच उपयोग केला आहे. मृत्यूची वार्ता कानानं ऐकणं आणि प्रत्यक्ष मृत्यू पाहणं यात फार फरक आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्या मृत्यूनं माझ्या संवेदनांना हलवून सोडलं.''

अध्यक्ष डॉ. आनंद यादव आपल्या भाषणांत म्हणाले, ''एकदाही हसू शकलो नाही तरी अत्यंत हृद्य असा हा आजचा समारंभ येथे संपन्न झाला आहे. डॉ. दिवेकरांचे विलक्षण जीवन, डॉ. केळकरांचे आणि डॉ. बावस्करांचे कार्य हे समाजाला प्रेरणा देणारे आहे. वीणा गवाणकर यांचे 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक मी वाचले आणि अचंबित झालो. हे पुरस्कार देताना म्हणूनच मला अतिशय समाधान वाटले.''

सुनीता दांडेकर यांनी सूत्र संचालन केले आणि सुनील मेहता यांनी आभार मानले.

### * सदानंद देशमुखांना साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान

'बारोमास' कादंबरी लिहिणारे प्रसिद्ध लेखक सदानंद देशमुख यांना १६ फेब्रुवारी रोजी साहित्य अकादमीचे अध्यक्ष गोपीचंद नारंग यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. श्री. देशमुख यांच्याबरोबर श्रीमती जयंती नायक, उपमन्यू चटर्जी व सलाम बिन रजाक यांना अनुक्रमे कोकणी, इंग्रजी व उर्दू भाषांतील सर्वोत्कृष्ट साहित्यकृतीबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. कन्नड साहित्यिक प्रा. यू. आर. अनंतमूर्ती प्रमुख पाहुणे होते. एकूण २२ भारतीय भाषांमधील साहित्यकृतींना पुरस्कार देण्यात आले. मानचिन्ह, मानपत्र व रोख पन्नास हजार रुपये, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

'फिक्की'च्या गोल्डन ज्युबिली सभागृहात झालेल्या या समारंभात बोलताना अकादमीचे अध्यक्ष नारंग यांनी भारतीय भाषा जगतील काय, याबद्दल चिंता व्यक्त केली. प्रा. अनंतमूर्ती यांनीही त्यास सहमती दर्शविली. भारतीय भाषा वाचविण्याच्या दृष्टीने साहित्य अकादमीने पुढाकार घ्यावा, खासगी शाळांमध्ये इंग्रजी भाषेला महत्त्व

देताना भारतीय भाषांबाबत अनास्था वाढत आहे असे सांगून अनंतमूर्ती म्हणाले, ''अमेरिकेच्या शक्तीमुळे आज जगात इंग्रजी प्रभावी ठरली आहे; परंतु निकृष्ट दर्जाचे साहित्य आपल्या देशात येत असून, त्यामुळे आपली संस्कृती व भाषा यांच्याबरोबर आपले संबंध तुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. आपल्या सर्वांसाठी हे एक आव्हान आहे. हे आक्रमण थांबवायलाच हवे.''

''भारतीय लेखक विविध कल्पनांसाठी भुकेले राहतील, तरच सकस व महान साहित्य निर्माण करू शकतील; मात्र त्यासाठी भारतीय संस्कृतीमध्ये आपले पाय भक्कम असायला हवेत. येत्या काही वर्षांमध्ये प्रादेशिक भाषा 'किचन लँग्वेज' होण्याची भीत असून, मुलांना भूक लागेल तेव्हा आपल्या आईबरोबर बोलण्यापुरती ती शिल्लक राहील,'' असा इशारा त्यांनी दिला. इंग्रजीमधून शिक्षण घेताना आपली भारतीय मुले आपापली मातृभाषा बोलतीलही; परंतु बौद्धिक, सकस साहित्य ते निर्माण करू शकणार नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

इंग्रजी भाषेचे पुरस्कार विजेते उपमन्यू चटर्जी मूळचे बंगाली असून, सध्या ते महाराष्ट्रात भारतीय प्रशासनसेवेत वरिष्ठ अधिकारी आहेत. सलाम बिन रझाक मूळचे पनवेल येथील असून, मुंबई महापालिका शाळेच्या मुख्याध्यापकपदावरून निवृत्त होऊन, कुर्ला येथे राहत आहेत.

### * चंद्रशेखर धर्माधिकारी यांना न्यायमूर्ती रानडे पुरस्कार

राष्ट्रीय सामाजिक परिषदेतर्फे देण्यात येणारा 'न्यायमूर्ती म. गो. रानडे पुरस्कार' यंदा उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश चंद्रशेखर धर्माधिकारी यांना २३ मार्च रोजी देण्यात आला. पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. ॲड. भास्करराव आव्हाड व महापौर दीप्ती चौधरी यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. 'सकाळ'चे संचालक-संपादक डॉ. अरुण टिकेकर या प्रसंगी 'न्यायमूर्ती म. गो. रानडे यांचे जीवनकार्य आणि सद्य:स्थिती' या विषयावर भाषण झाले.

### * प्रभुणे, डॉ. अभ्यंकर यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार

सामाजिक कृतज्ञता प्रतिष्ठानातर्फे पहिला 'सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे व कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष डॉ. मुकुंद अभ्यंकर यांना डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते सहा मार्चला यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात देण्यात आला.

''सामाजिक प्रबोधन, शिक्षण, स्वयंरोजगार; तोच कुटुंब संस्था आधिक सक्षम व समर्थ करण्याच्या उद्देशाने प्रतिष्ठानातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात.''

पुरस्काराचे स्वरूप दहा हजार रुपये रोख असे आहे.

### * भारत सासणे यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार

कऱ्हाड येथील 'महाराष्ट्र वाङ्मय मंडळा'तर्फे देण्यात येणारा 'यशवंतराव चव्हाण कऱ्हाड पुरस्कार' यावर्षी साहित्यिक भारत सासणे यांच्या 'आयुष्याची छोटी



गोष्ट' या कथासंग्रहासाठी जाहीर झाल्याचे 'मंडळा'तर्फे कळविण्यात आले आहे. दहा हजार रुपये रोख व गौरवचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. विलास खोले, विजय कुवळेकर आणि प्रा. रेखा इनामदार साने यांच्या निवड समितीने कथासंग्रहाची निवड केली. पुरस्कार १२ मार्चला कऱ्हाड येथे देण्यात आला.

### * श्रीनिवास रायरीकर यांना दासबोध पुरस्कार

देशस्थ ऋग्वेदी शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे देण्यात येणारा 'काशी केशव दासबोध पुरस्कार' या वर्षी 'दासबोध'चे अभ्यासक श्रीनिवास रायरीकर यांना देण्यात आला.

'दासबोधातील व्यवस्थापनविषयक संकल्पना' विषयावर श्री. रायरीकर यांची आजपर्यंत विविध ठिकाणी व्याख्याने झाली असून, 'दासबोध'ग्रंथाचा त्यांचा गेली १५ वर्षे अभ्यास आहे.

### * कवी म. भा. चव्हाण यांना शिवाजी सावंत पुरस्कार

साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी साहित्य परिषदेतर्फे दिला जाणारा 'मृत्युंजयकार शिवाजी सावंत जीवन गौरव' पुरस्कार कवी म. भा. चहाण यांना जाहीर झाला आहे. पंचवीस हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. चव्हाण गेली पंचवीस वर्षे सातत्याने काव्यलेखन करीत आहेत. 'धर्मशाळा'या त्यांच्या काव्यसंग्रहाला 'यशवंतराव चव्हाण साहित्य स्मृती पुरस्कार' मिळाला आहे.

### * सुलभा हेर्लेकर यांच्या पुस्तकाला कुसुमाग्रज पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा व कॉन्टिनेंटल प्रकाशनाने पुरस्कृत केलेला 'कविवर्य कुसुमाग्रज पुरस्कार' या वर्षी नागपूरच्या कवयित्री सुलभा हेर्लेकर यांच्या 'शुभ्र सकाळ' काव्यसंग्रहाला 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी श्री. धारिया म्हणाले, ''हेर्लेकर यांच्या कवितांचे वैशिष्ट्य म्हणजे शेवटच्या दोन ओळींत चिंतनपर विचार मांडण्याचे त्यांचे कौशल्य हे होय.'' परीक्षकांच्या वतीने अंजली कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

### * दिवाळी अंक स्पर्धेचे निकाल जाहीर

'शब्दसागर' संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक (२००४) स्पर्धेत, 'ज्योतिषज्ञान' (संपादक सिद्धेश्वर मारटकर) व 'आपले छंद' (संपादक दिनकर शिलेदार) या दिवाळी अंकांना 'सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकां'चा पुरस्कार जाहीर झाले.

'ग्राहकहित', 'साहित्यआभा', 'आरोग्यदर्पण', 'तारका', 'वाद-संवाद', 'सरगम', 'नवरंग', 'विश्रांती', 'फुलोरा' हे अंकही पुरस्कारप्राप्त ठरले.

### * डॉ. शंकर पुणतांबेकर यांचा गुरुकुल प्रतिष्ठानतर्फे सत्कार

''इलेक्ट्रॉनिक माध्यमांऐवजी व्यंग्य साहित्य वाचणे सुखाचे आहे. या साहित्यामुळे वाचकांची विचार करण्याची मानसिकता तयार होते,'' असे मत हिंदीतील प्रसिद्ध

'व्यंग साहित्यकार' डॉ. शंकर पुणतांबेकर यांनी येथे झालेल्या सत्कार प्रसंगी व्यक्त केले. बँक ऑफ महाराष्ट्रचे सहाय्यक महाव्यवस्थापक डॉ. दामोदर खडसे व प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अशोक कामत याप्रसंगी उपस्थित होते.

डॉ. पुणतांबेकर म्हणाले, ''व्यंग्य ही चघळण्याची, खेळण्याची गोळी नसून; ती बंदुकीची गोळी आहे. तो मनन, चिंतनाचा विषय आहे. 'चतुर बयानी' ही व्यंग्यांची ताकद आहे. त्यामुळे हिंदी साहित्याचे विविध प्रकार असूनही, मी व्यंग्य प्रकाराची निवड केली. चाळीस वर्षे मी व्यंग्य साहित्याचे लेखन करीत आहे; नऊ हजार शब्दांचा 'अमर व्यंगकोश'तयार केला आहे.''

*** डॉ. रावसाहेब कसबे यांना राष्ट्रीय बंधुता पुरस्कार**

'बंधुता परिवार'तर्फे दिला जाणारा 'राष्ट्रीय बंधुता पुरस्कार' या वर्षी ज्येष्ठ साहित्यिक आणि तिसऱ्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांना देण्यात आला. पाच हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरू आहे.

नगर येथे झालेल्या सहाव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनात अध्यक्ष फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले.

*** उत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धेत 'मामू'ला 'बालमित्र'पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक स्पर्धेत 'मामू' अंकाची 'बालमित्र मासिक पुरस्कारा'साठी निवड झाली.

रेणू पाचपोर (बडबड), प्रथमेश कुलकर्णी (पुस्तकाची गंमत), अनिल सोनार (छोटू पापा), माधुरी माटे (पाखराचं गाव), नीलेश पाटील (आभाळ), सरिता सडेकर (सूर्य तुला शोधायचा आहे) यांच्या कविता उत्कृष्ट ठरल्या, तर मंजुषा आमडेकर (सुरीची यखीर), भारती म्हात्रे (गुणाचं बाळ), डॉ. संजय ढोले (सोन्याची खाण), कविता मेहेंदळे (फुलाची परडी) यांच्या कथा उत्कृष्ट ठरल्या. भारती पांडे, डॉ. नीलिमा गुंडी, आश्लेषा महाजन यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

*** दलित साहित्य पुरस्कार**

पुण्याच्या दलित साहित्य संशोधन व अध्ययन केंद्राच्या वतीने प्रत्येक वर्षी दलित साहित्यकृतीला पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन याचा समावेश असेल. एक जानेवारी ते ३१ डिसेंबर दरम्यान प्रसिद्ध झालेल्या साहित्यकृतीच्या प्रत्येकी दोन प्रती डॉ. मनोहर जाधव, प्रपाठक, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे येथे पाठवाव्यात.

*** 'गंधर्वछाया'ला पुरस्कार**

उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठी दिला जाणारा चरित्र साहित्य प्रकारातील पुरस्कार स्वाती कर्वे यांनी लिहिलेल्या 'गंधर्वछाया' या पुस्तकाला मिळाला आहे.



*** सांस्कृतिक ऱ्हास रोखण्यासाठी शाहिरांची गरज**

''मनोरंजनाच्या नावाखाली सांस्कृतिक ऱ्हास करण्याचा कार्यक्रम सर्वत्र सुरू आहे. अशा वेळी दमदार, निर्व्यसनी व चरित्र्यसंपन्न शाहिरांची गरज आहे,'' असे प्रतिपादन महाराष्ट्र शाहीर परिषदेचे अध्यक्ष शाहीर योगेश यांनी केले.

परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त भरत नाट्य मंदिरात आयोजिलेल्या सोहळ्याला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित प्रमुख पाहुणे होते.

शाहीर योगेश म्हणाले,''पोवाड्यातून जनसामान्यांचे प्रबोधन होते. शाहिरांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट बनत चालली आहे. वाटेल तेथे पैसा खर्च करणाऱ्या शासनाकडे शाहिरांच्या मानधनासाठी पैसा नाही. कोणाच्या मदतीची अपेक्षा न ठेवता सांस्कृतिरक्षणासाठी आम्ही सर्व शाहीर एकजुटीने उभे आहोत.''

या प्रसंगी 'महाराष्ट्र शाहीर भूषण', 'शाहीर गौरव', व 'युवा शाहीर' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

'महाराष्ट्र शाहीर भूषण पुरस्कार'- रामभाऊ पवार (बुलडाणा), आनंदराव आमले (कागल, जि. कोल्हापूर) व शीघ्रकवी यशवंत भिसे (काटेवाडी, ता. बारामती), 'शाहीर गौरव पुरस्कार'- शिवाजीराव पाटील (जळगाव), मोहन मोहोड (अकोला), प्रभाकर साळवी (मुंबई) व भीमराव बावनकुळे (नागपूर) आणि 'युवा शाहीर पुरस्कार' रंगराव पाटील (कोल्हापूर) व विजय पांडे (अकोला) यांना देण्यात आला.

या वेळी श्री. दीक्षित म्हणाले,''सर्वस्व वेचून संस्कृतीचे रक्षण करणारे शाहीर ही समाजाची श्रीमंती असते. समाजाच्या हाती तेजाचा अंश देणारा शाहीरच असतो. समाजानेही शाहिरांचा गौरव केला पाहिजे.''

श्री. पुरंदरे म्हणाले, ''शाहीर निरपेक्ष असतात. देश, धर्मासाठी जीवन व्यतीत करण्याची ती प्रेरणा देतो. अशा शाहिरांचा आदर-सत्कार करणे हे समाजाचे कर्तव्य आहे.'' शाहिरांच्या मदतीसाठी श्री. पुरंदरे यांनी २५ हजार रुपये व पुण्याचे माजी महापौर माऊली शिरवळकर यांनी ११ हजार रुपये परिषदेला दिले. शाहीर रंगराव पाटील व विजय पांडे यांच्या पोवाड्यांचे सादरीकरण झाले.

*** सूर्योदय मराठी साहित्य संमेलन पुरस्कार**

२६ व २७ नोव्हेंबर २००५ रोजी जळगाव येथे दुसरे सूर्योदय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. त्याच्या अध्यक्षपदी प्राचार्य राम शेवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्घाटन गिरिजा कीर यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनात २००४ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांना पुरस्कार देण्यात येणार आहे.

गिरिजा कीर बालकथा पुरस्कार, समाजसेवक दलुभाऊ जैन कथा संग्रह पुरस्कार हे दोन्ही पुरस्कार रोख १००१/- रुपयांचे आहेत. बदामबाई देसर्डा पुरस्कार काव्य संग्रहासाठी तर रंभाबाई भंगाळे पुरस्कार बालकाव्य संग्रहासाठी आहे.

संपर्क - सतीश जैन, ४९ब, खोटे नगर (सुरक्षा नगर),
जळगाव - ४२५ ००२ (खानदेश)

साधंसुधं...

# भेट

**प्रमोदिनी वडके-कवळे**

दक्षिणेकडची सहल करून आलो होतो. आल्यागेल्याला फोटो दाखवून प्रवासवर्णनाची पारायणं चालली होती. प्रवासाच्या आठवणी अजून ताज्या असल्याने त्यांच्याबद्दल पुन:पुन: बोलावंसं वाटत होतं.

एका संध्याकाळी स्वरदा आली. स्वरदाला प्रवासाची विशेष आवड. त्यातही नेहमीच्या गर्दीतल्या ठिकाणांपेक्षा जरा कमी लोकप्रिय, पण शांत ठिकाणी जायला, त्यांची वैशिष्ट्यं शोधायला तिला फार आवडतं. म्हणून मी तिला मद्रास, मदुराईच्या देवळांचे फोटो दाखवण्याच्या भरीस पडलेच नाही. सरळ आल्बमची शेवटची पानं उघडली...''हे बघ. धनुष्कोडीचे फोटो. तुला फार आवडतील.'' माझ्या स्वरात काठोकाठ उत्साह भरला होता.

धनुष्कोडी हे दक्षिणेतलं अगदी शेवटचं टोक. भारताची जलसीमा इथून अगदी थोड्या अंतरावर संपते आणि श्रीलंकेची जलसीमा सुरू होते. काही वर्षापूर्वी झालेल्या प्रलयंकारी वादळाने हे गाव निर्मनुष्य केलंय. आता तिथे फक्त बिभीषणाचं एकांडं मंदिर तेवढं उभं आहे. सकाळ संध्याकाळ तिथे जाऊन येणारा पुजारी हीच त्या गावाची लोकसंख्या. पर्यटकांच्या यादीत हे स्थळ कुठेच नसल्याने तिथपर्यंत जायला सोयीचं वाहनसुद्धा नाही. आम्ही मात्र आटापिटा करून, एका रिक्षावाल्याला मनवून तिथपर्यंत जाऊन आलो होतो. चारी बाजूला अथांग सागर, जमिनीचं एक अरुंद टोक त्या सागरात मधेच घुसलेलं... त्या टोकाच्या अगदी कडेला उभं राहून आपल्या देशाच्या सरहद्दीवर उभं राहिल्याची जाणीव, तिथल्या नि:शब्द शांततेनं मनाला दिलेलं अपूर्व समाधान आणि तरीही त्या निर्मनुष्यतेनं मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी वाजलेली भयाची घंटा असा एक अगदी वेगळा, रोमांचकारी अनुभव नुकताच आम्ही घेतलेला होता. त्याबद्दल भेटेल त्याच्याशी बोलत होतो... तरीही त्या अनुभवाबद्दल स्वरदाजवळ बोलणं जास्त सुखकारक असणार होतं. कारण त्या अनुभवाची खरी किंमत, खरं कौतुक स्वरदालाच कळणार होतं... म्हणून ते फोटो, तो अनुभव मी घाईघाईने तिच्या समोर उलगडायला सुरुवात केली होती.

पण स्वरदा थंडच!



''मी दोनदा जाऊन आलेय धनुष्कोडीला. तिसऱ्या वेळीही जाण्याची संधी होती. पण नाही गेले.''

''का ग? तुला नाही आवडलं धनुष्कोडी?''

''आवडलं नाही असं नाही म्हणता येणार, पण आजकाल मला वाटायला लागलंय की आवडत्या गोष्टी एकदाच कराव्यात. आवडत्या ठिकाणीही एकदाच जाऊन यावं..''

''...?''

''कुठल्याही भेटीचं नातं केवळ त्या क्षणांशी, त्या वेळच्या मूडशीच असतं असं माझ्या लक्षात आलंय. मग ती भेट माणसांची असो नाहीतर स्थळांची...''

चहा घेऊन आणि मद्रासची खरेदी बघून स्वरदा निघून गेली. जाताना मेंदू पोखरणाऱ्या त्या वाक्याचा किडा माझ्या मनात अलगदपणे सोडून गेली.

''भेटीचं नातं केवळ त्या क्षणाशीच.. मग ती भेट माणसांची असो नाहीतर स्थळाची...''

''भेट!'' किती विविधार्थी शब्द आहे. पण तरीही त्याचे सगळे अर्थ सुखावणारेच..काहीतरी मिळाल्याचा आनंद देऊन जाणारे. अचानकपणे रस्त्यात 'झालेली' प्रियव्यक्तीची भेट असो, एखाद्या समारंभाच्या निमित्ताने 'मिळालेली' वस्तूची भेट असो नाहीतर कारणापरत्वे एखाद्या ठिकाणाला 'दिलेली' भेट असो... प्रत्येक भेटीत मुठीत काहीतरी गवसून जातंच... हवंसं... नकोसं...

या भेटींचं नातं आनंदाशी, आपल्या मनाशी, मनातल्या आठवणींशी असतं हे प्रत्येकाला ठाऊक असलेलं सत्य. ते सत्य उलटसुलट निरखून, त्याची वेगळी बाजू शोधण्याची वेळ कधी आलीच नव्हती... स्वरदाच्या आडमुठ्या वाक्याने मात्र मला आज ते सत्य तपासून पहावंसं वाटायला लागतं. आजवरच्या कितीतरी अविस्मरणीय 'भेटी' मनात रुंजी घालायला लागल्या.

...अनुराधा आपटे. माझी अतिशय आवडती लेखिका. आपटेबाई पुण्यात आल्या की मी वेळात वेळ काढून त्यांना भेटायला जायची. त्या पुण्याला यायच्या बहुधा त्यांच्या कथाकथनाच्या कार्यक्रमासाठीच. मध्यंतरात त्यांच्याभोवती चाहत्यांचा गराडा पडायचा. त्या गर्दीतलीच मीही एक. कार्यक्रमाला जाणं जमलं नाही तरी मी ती मध्यंतराची वेळ गाठण्यासाठी धडपडायची. आपटेबाईही माझ्या नेहमी येण्याची नोंद घ्यायच्या. 'नवीन काय वाचलंत?' अशी हसरी, जिव्हाळ्याची चौकशी

करायच्या. ''माझी या मासिकातली कथा वाचा हं. जरा वेगळ्या विषयावर लिहीलीय.'' असंही आवर्जून सांगायच्या... त्यांच्या अशा जाहीर जवळीकीने मी फुशारून जायची अगदी.

एकदा परिसंवादासाठी म्हणून त्या पुण्यात आल्या होत्या. माझ्या मुलीला त्यांची स्वाक्षरी घ्यायची होती. मोठ्या ऐटीत मी तिला म्हटलं,''चल, तुझी ओळखच करून देते.''

पण त्यादिवशी कशाने कोण जाणे बाईंचा मूड अगदी बिघडलेला होता. माझ्या येण्याची दखल घेणारं त्यांचं हसू नेहमीसारखं प्रसन्न नव्हतं. तिथे 'काय कटकट आहे!' असा वैतागाचा भाव होता. त्या दिवशी खरंतर नेहमीपेक्षा जास्त वेळ मला त्यांना भेटता आलं. त्यांच्या मी वाचलेल्या कथांबद्दल थोडं बोलता आलं... पण बाईंच्या वागण्यात नेहमीची आस्था नव्हती. मी त्यांच्या कथेबद्दल केलेलं भाष्य त्यांनी 'तुला पामराला माझ्या अक्षरांची किंमत कोठून कळणार?' अशा मुद्रेने ऐकून घेतलं.

आजपर्यंत माझ्या तोंडून त्यांच्याबद्दलची भक्तिगीतं ऐकत आलेल्या माझ्या लेकीच्या चेहऱ्यावर ''वाटलं नव्हतं आई इतकी यडपट असेल.'' हे वाक्य सुस्पष्ट उमटून आलं.

आजवर आमच्या अनेक भेटी झाल्या होत्या. कमी वेळाच्या, कमी शब्दांच्या... पण आजच्या या जास्त वेळाच्या, जास्त शब्दांच्या भेटीपेक्षा त्या भेटींमधला संवादच मला अधिक वाटला. ही भेट ओल्या बोळ्यासारखी... मागच्या भेटींमधला संवाद, सुगंध सगळंच पुसून टाकणारी...

मी पुन: कधी आपटेबाईंना भेटण्याचा आटापिटा केला नाही.

कारण 'भेटण्याचा अर्थ' आता मला समजला होता.

भेट म्हणजे दिसणं किंवा केवळ समोरासमोर येणं नाही, तर भेट म्हणजे मनाच्या तळापर्यंत पोचणं. गवयाने छेडलेला एखादा सुरेल स्वर किंवा आलाप बाण रुतावा तसा ऐकणाऱ्याच्या काळजात खोल रुततो आणि जखमेतून रक्त यावं तितकी टचकन् दाद येते...'वा!' ही दाद खरोखरच जखमेतल्या रक्तासारखी असते... उत्स्फूर्त, सच्ची, ताजी आणि शरीरमनालाही स्पर्शून वर उसळणारी... ती दाद म्हणजेच स्वर आणि श्रवण यांची भेट असते. आवडत्या व्यक्तीला, आवडत्या वस्तूची भेट दिल्यावर घेणाऱ्याला डोळ्यात उमटणारा कौतुकाश्चर्याचा आनंद आणि देणाऱ्याच्या नजरेतली कृतार्थता देखील हेच सांगते की ती भेट हृदयाच्या तळापर्यंत पोचलीय.



हे पोचणंच खरं म्हणजे खरं असतं. पण आपण दरवेळीच ते लक्षात घेतो असं नाही.. दरवेळी आपण केवळ समोर दिसणंच खरं मानतो आणि ''आम्ही अगदी रोज भेटतो...'' असं सांगून एखाद्याबद्दलची जवळीक जाहीर करून मोकळे होतो... पण रोज भेटणारा माणूस क्वचित कधीतरीच मनाच्या आतल्या कप्प्यापर्यंत पोचतो... कधीकधी तर तेही घडत नाही.

लहानपणीची मैत्रीण रस्त्यात भेटते तेव्हा ती फक्त शरीरानेच प्रौढ झालेली असते असं नाही, तर मनाचीही कोवळीक घालवून बसलेली असते... म्हणजे खरं तर आपल्याला आपली बालमैत्रीण भेटतच नाही... त्याच नावाआडनावाची, त्याच देहातली काळाबरोबर 'पिकत' गेलेली व्यक्ती तेवढी भेटते.

आपण मनात जपलेलं, खूपदा स्वप्नात येणारं आपल्या बाळपणीचं घर बघायला म्हणून हौसेनं रजा काढून जावं तर ते अेखाद्या दातपडक्या म्हाताऱ्यासारखं उदास. थकलं समोर येतं आणि तरीही मरगळल्या स्वरात आपण सांगतो... जुन्या घराला भेट देऊन आलो...

विचार करत गेले तसतसा स्वरदाच्या शब्दांचा अर्थ माझ्या मेंदूत स्पष्ट उमटत गेला. त्याचे वेगवेगळे पदरही उलगडले.

मद्रासच्या फोटोंचा आल्बम उघडून तो धनुष्कोडीचा फोटो बघताना वाटलं, खरंच! आताच्या प्रवासाच्या आठवणी पुसट, फिक्या झाल्यावर पुन: अेकदा धनुष्कोडीला जाऊन यायला हवं.

कोण जाणे! त्यावेळी तो निर्मनुष्य किनाराही मला गजबजलेला वाटू शकेल...

कदाचित मीच तोपर्यंत बदलून गेलेली असेन... शांतता सहन न होण्याइतकी!

आपणही बदलत जातो हे आपल्याला कुठे जाणवतं? इतर व्यक्तिठिकाणांबद्दल मात्र केवढा फरक पडलाय, असं आपण म्हणतो,


पण स्वत:च्याही बदलत्या रूपांना 'भेटायला' हवंच अधूनमधून!

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**तुमच्याकडे हवीतच अशी काही नवी पुस्तके....**

| | | | |
|---|---|---|---|
| **गोष्टी माणसांच्या १३०रु.** | **२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी १३०रु.** | **हसता हसता आरोग्य ९०रु.** | **शिवा डान्सिंग २५०रु.** |

# बालनगरी




## हॅरी पॉटर टॉक शो

### यशस्वी मुलांची धमाल उत्तरे

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| श्रुती पावगी- अहिल्यादेवी हायस्कूल | ५३ |
| रोशनी म्हेत्रे- रेणुका स्वरूप हायस्कूल | ५४ |
| हिमानी बिरनाळे- एच. एच. सी. पी हायस्कूल | ५६ |






**श्रुती विनायक पावगी**
**इ. ८वी, अहिल्यादेवी**
**हायस्कूल, पुणे ३०.**

**१)मला जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर!**

मी हॅरी पॉटरकडून पुढच्या दशकात जाण्याची जादू मिळविन. त्या दशकात जाऊन पुढे काय काय घडामोडी, घटना घडणार आहेत हे जाणून घेईन. तेथे खूप दिवस राहीन. तेथील लोकांच्या शैलींचा अभ्यास करीन व परत २००५ या दशकात येऊन सर्व लोकांना पुढे काय होणार आहे याची कल्पना देईन. त्याप्रमाणे वागण्याची सूचना देईन. इथल्या लोकांना सांगेन की 'खूप प्रदूषण करू नका'. पुढे खूप संकटे आहेत. एक दिवस सगळी जंगले नष्ट होणार आहेत. लहान मुलांना जंगले कशी असतात, हे फोटो मधून दाखवायला लागेल. ह्या सगळ्या बरोबरच मी मागच्या दशकात सुद्धा जाईन खरा 'शिवाजी कसा होता?' हे पाहीन. इंग्रजांनी 'आपला देश कसा काबीज केला' हे पाहीन. आपल्या दशकात परत येईन तेव्हा सगळ्यांना सांगू शकेन की हॅरी पॉटर कडून मिळालेल्या जादूचा मी खूप चांगला उपयोग करून घेतला आहे.

**२)हॅरी पॉटर कडून कोणती जादूची गोष्ट मागाल?**

हॅरी पॉटर कडून मी त्याची जादूची काठी घेईन. हॅरी पॉटर त्या जादूच्या काठीने त्याच्या मनात असणाऱ्या सर्व इच्छा पूर्ण करू शकतो. त्याचप्रमाणे आलेल्या संकटांना धैर्याने तोंड देण्यासाठी वापरत असतो. त्याची अदृश्य होण्याची शालही मी घेईन. व ह्या दोन्ही गोष्टींचा वापर मी चांगले कृत्य करण्यासाठी करीन.

माझी इच्छा अशी आहे की सध्याच्या काळात कुठल्याही वर्तमानपत्रात खून, दरोडे, अपघात, चोरी, दहशत या सारख्यात बातम्या जास्त करून असतात.

आम्हा लहान मुलांना अशा बातम्या वाचून खूप भीती वाटते व असे वाटते की हे कुठे तरी थांबले पाहिजे. नाहीतर कलियुग लांब नाही. ह्या सर्व प्रश्नांचे उत्तर आहे पॉटर च्या काठीमध्ये तिचा वापर करून हे सर्व घडूच नये, याच साठी मी ती काठी माणसांवरून फिरवीन व त्यांची मनोवृत्तीच बदलून टाकीन.




**रोशनी राजेंद्र म्हेत्रे**
**इ. ६ वी . रेणुका स्वरूप**
**हायस्कूल, पुणे.**


**जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर तुम्ही कोणती जादू शिकाल?**

जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर मी सर्वप्रथम जादूच्या कांडीची जादू शिकेन. ही कांडी सदैव मी माझ्यासोबत ठेवेन. जेथे जेथे दुःख, दारिद्र्य आहे तेथे तेथे जादूची कांडी समोर धरून मी आनंदाची पखरण करेन. ह्या दुनियेत सर्वत्र
''आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चाहीकडे!'' असे सुखमय वातावरण निर्माण करेन. जादूच्या कांडीमुळे मी जगभर कोठेही एका क्षणात संचार करू शकेन.

जेव्हा पाहिजे तेव्हा दृश्य तर केव्हा अदृश्य स्वरूपात सर्वत्र हवे तेवढे भ्रमण करता येईल. जे जे अन्यायकारक आहे तेथील जुलूस, जबरदस्ती करणाऱ्या लोकांना शासन करेन. वठणीवर आणेन. समर्थ रामदास म्हणतात, त्याप्रमाणे
''नाठाळाचे माथी घालून काठी! आणिन वठणी त्यांना!''

जादूच्या शाळेत कोणालाही मोफत शिक्षण मिळण्याची व्यवस्था करेन. फक्त जादू शिकणाऱ्या मुलांनी प्रतिज्ञा घ्यायची की, ''शिकलेली जादू विधायक कार्यातच वापरेन अन्यथा जादूच्या कांडीमुळे अराजकता वाढेल. जादूची कांडी कोठेही पडली तरी ती माझ्याकडेच येईल. अशी व्यवस्था मी करीन.''

मला जगात काय कोठे चालले आहे याची माहिती एका ठिकाणी बसून समजेल अशी व्यवस्था करेन. त्यामुळे चोऱ्या, दंगे, अतिरेकी कारवायांना पायबंद बसेल. भ्रष्टाचारी लोकांना वेसण घातली जाईल. सर्वत्र सुख, शांती, आरोग्यमय जीवन व आनंद निर्माण होईल. कष्टकरी, श्रमकरी लोकांना अन्न, वस्त्र, निवारा मिळेल अशी मी व्यवस्था निर्माण करेन.

सदैव मला सद्बुद्धी व जादूच्या कांडीच्या सद्वापर होऊ दे अशी प्रार्थना सर्वशक्तिमान परमेश्वराला करेन. हॅरी पॉटर प्रमाणे माझे व देशाचे नाव जगभर व्हावे म्हणून प्रयत्न करीन.



**२)हॅरी पॉटरकडून तुम्ही कोणती जादूची गोष्ट घ्याल? आणि त्याने काय काय धमाल कराल?**

बसलेल्या ठिकाणाहून केवळ जादूई मंत्राच्या सहाय्याने हाताने इशारा करताच हवे तसे घडवून आणण्याची जादू हॅरी पॉटरकडून मी शिकेन. त्यातून कित्येक चांगल्या गोष्टी मला करता येतील तर केव्हा केव्हा खरपूस मारही बसेल खरा! उदा. मला न आवडणाऱ्या विषयाच्या बाई तासावर येत असतील तर त्यांना आज तास 'ऑफ' आहे अशी सूचना एका शिपाईकाकांमार्फत पोहचवली की आम्ही चांडाळचौकडी खेळायला मोकळे होऊ! मारकुटे इंग्रजीचे सर वर्गावर येताच छडी आपटतात. मी त्यांची छडी एकदा हवेतच तरंगत ठेवणार आहे. ती ही इतकी उंच की सरांच्या हाताला लागू नये व ते पकडायला जातील तेव्हा एक दोन छड्या त्यांना बसल्या म्हणजे आम्हाला किती वेदना होतात हे त्यांना कळेल. खेळाचा तास लवकर संपून खेळाच्या तासाची घंटा फार लवकर वाजवली जाते असे वाटते. शिपाईकाकांना घड्याळ पुढे गेलेलेच नाही असे वाटेल ह्या पद्धतीत घड्याळाला सूचना देईन व खेळाचा तास चांगला दोन तास वाढवेल. शाळेतील आमच्या खादाड मावशी सदानकदा कॅंटिनमध्ये चरत असतात. एकदा त्यांच्या तोंडात मिरचीचा बकाणा भरून त्यांची सवय मी घालवणार आहे. आमच्या शेजारील दांडगट तनुजा जेव्हा तेव्हा खेळण्याचा बेरंग करत असते, तिला बसलेल्या जागेवरच खेळताना स्थानबद्ध करेन. म्हणजे जागेवरून उठू न शकल्याने ती आम्हाला त्रास देऊ शकणार नाही.

हे सगळे गमतीचे प्रसंग निर्माण केले तरी आम्हा मुलांचे अभ्यासातील लक्ष कमी होणार नाही याचीही मी दक्षता घेणार आहे बर का! कारण विद्यार्थी दशेतील महत्त्वाचे उद्दिष्ट आम्हाला साध्य करून देशाचे नाव उन्नत करायचे आहे.

त्यानंतर मी देशातील भ्रष्टाचार निर्मूलनावर भर देणार आहे. जेथे जेथे लाचलुचपत, भ्रष्टाचार होत आहे तेथील सर्व काळा पैसा हवेतच उडवून गोर-गरीबांना वाटणार आहे. सर्व भ्रष्टाचारी पुढारी व लोकांची भंबेरी उडवून त्यांना अशा कृत्यांपासून परावृत्त करणार आहे. त्यानंतर मी वळणार आहे ते देशद्रोही लोकांकडे! साम, दाम, दंड या सर्व मार्गाचा अदृश्य होऊन मी त्यांच्यावर प्रयोग करणार आहे. व त्यांच्या सत्प्रवृत्ती वाढीस लागतील असे प्रयत्न करणार आहे.

माझी मातृभूमी संतांच्या व ऋषीमुनींच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. तिचे पावित्र्य परत मिळवून देऊन भारताला जगतवंद्य विश्वगुरू बनवून ''वसुधैवकुटुंबकम्'' चा खरा अर्थ सर्वांना समजावून देऊन सर्वशेवटी माझी जादू मी ईश्वरचरणी अर्पण करून केवळ रोशनी बनून देशसेवेत मग्न होणार आहे.



**हिमानी सुरेश बिरनाळे**
**इ. ७ वी. एच.एच.सी.पी.**
**हायस्कूल, पुणे.**

**१) जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर तुम्ही कोणती जादू शिकाल?**

जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर मी तेथील सर्व जादूंची माहिती मिळवीन. त्यातील मला आवडेल अशी म्हणजे जादूच्या छडीने जादू कशी करायची? हे शिकेन.

**२) हॅरी पॉटर कडून तुम्ही कोणती जादूची गोष्ट घ्याल? आणि त्याने काय काय धमाल कराल?**

हॅरी पॉटर कडून मी जादूची काठी घेईन. त्या काठीने मी कबुतराच्या एका पिसाने अनेक कबुतरे बनवीन. ती काठी मंत्र पुटपुटून फिरवली की मी अमेरिकेत, आफ्रिकेत अनेक ठिकाणी जाईन. जंगलात जाऊन सिंहाच्या पिल्लांशी खेळेन. सिंह आला की मी परत छडी फिरवून घरी येईन. जर कोणी मला ओरडत असेल तर मी त्याला बर्फ बनवून टाकेन. जेव्हा मी कुठे चांगल्या कार्यक्रमाला किंवा इतर ठिकाणी बाहेर फिरायला जाणार असेन तेव्हा मी स्वत:भोवती छडी फिरवली की मला पाहिजे तसे ड्रेस, पाहिजे तसा मेकप व पाहिजे तशी हेअर स्टाईल करीन. रस्त्यात ट्रॅफिक जॅम असेल तर मी आमची गाडी जादूने हवेत उडवीन व उडत उडत ज्या ठिकाणी मला जायचे आहे, त्या ठिकाणी जाईन. जेव्हा आम्ही बास्केट बॉल खेळत असून तेव्हा जादूची छडी फिरवून मी जेव्हा उडी मारून बॉल बास्केट मध्ये घालीन व दुसऱ्या सामन्यातल्या ज्याच्या कडे बॉल असेल त्याला गुदगुल्या करून त्याच्याकडून बॉल घेईन. जर माझा अभ्यास अपूर्ण असेल तेव्हा छडी फिरवून मी अभ्यास पूर्ण करेन. मी जादूची काठी फिरवीन व अदृश्य होऊन मला पाहिजे त्या पिक्चरचे शूटींग पाहू शकेन. मग पुन्हा नेहमीच्या स्थितीत येईन व अनेक हिरो हिरॉईन यांना भेटू शकेन माझ्याकडे जादूची छडी असल्यामुळे मी भूतकाळात जाऊन माझ्या चुका सुधारू शकेन. माझ्याकडे ती जादूची छडी असेल तर माझे नाव सर्व जगास माहित होईल. जर कोणी माझा केक खात असेल तर मी छडी फिरवून मी त्याल डुकरासारखी शेपूट आणीन. सर्वांना माझ्याविषयीची माहिती जाणून घ्यायची इच्छा असेल, मला भेटण्याची इच्छा निर्माण होईल त्यावेळी मी या जगात एक निराळी व्यक्ती म्हणून वावरत असेन.